बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के




बीड | मंगळवार,दि.२० मे २०२५ | वर्षे४थे | अंक२७५वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# जिल्हा नियोजनाचा ५७५ कोटींचा आराखडा सादर

उपमुख्यमंत्री अजित पवारांनी घेतला योजनांचा आढावा

गुणवत्तापूर्ण कामे आणि पारदर्शी कामांवर भर द्या

आता निधी थेट मिळणार नाही, भूमिका स्पष्ट

## बीडच्या विकासासाठी वाढीव निधी



पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड: जिल्हयाच्या विकासासाठी मी स्वत: अर्थमंत्री म्हणून अधिकाधिक निधी देत आहे अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज दिली. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. आज झालेल्या बैठकीत जिल्हयाचा ५७५ कोटी रुपयांचा (सर्वसाधारण) आराखडा सादर करण्यात आला. या बैठकीस पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने तसेच पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख उपस्थिती होती.,समिती प्रतिनिधींमध्ये आ. विक्रम काळे, आ. सतीश चव्हाण, आ. सुरेश धस, आ. प्रकाश सोळंके, आमदार धनंजय मुंडे आमदार नमिता मुंदडा,आ. विजयसिंह पंडित आदींनी या बैठकीत सहभाग घेतला.

वर्ष २०२४-२५ चा आराखडा ४८४ कोटी रुपयांचा होता ही संपूर्ण रक्कम १०० टक्के खर्च झाली आहे. याचा आढावा देखील आजच्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पुढील वर्षीच्या प्रस्तावित आराखडयाबाबत सादरीकरण केले.मागील बैठकीतील इतिवृत्तावर या बैठकीत चर्चा होवून त्यास मंजुरी देण्यात आली.गुणवत्तापूर्ण कामे आणि पारदर्शी कामांवर भर द्या व दिलेली कामे वेळेत पूर्ण करा असे सांगून श्री पवार यावेळी म्हणाले की यापुढील काळात निधी जिल्हयाला थेट वर्ग न करता तो मुंबईहुन झालेल्या कामाच्या प्रमाणात जारी करण्याचे धोरण अंमलात आणले जाणार आहे.गतवर्षी ४८४ कोटींचा आराखडा होता परंतू प्रत्याक्षात ४४६.३० कोटी इतका अंतिम आराखडा मंजूर झाला होता यात वर्ष २०२५-२६ करिता १२८ कोटी रुपयांची वाढ करुन तो ५७५ कोटीच करण्यात आला आहे. २०२२-२३ च्या तुलनेत यंदाचा आराखडा दुप्पट आहे हे उल्लेखनीय. नियोजन समितीमधील कोणतेही काम १५ लाख रुपयांपेक्ष कमी असू नये तसेच कामाचे तुकडे पाडण्यात येवू नयेत प्रस्तावित जागेची मालकी तसेच त्याचे अक्षांश-रेखांश प्रस्तावित सामिल हवे अशा अटी यावर्षी घालण्यात आलेल्या आहेत. कामाच्या ठिकाणी कामाच्या माहितीचे फलक अनिवार्य करण्यात आले असून कामांना प्रशासकीय मंजूरी प्रदान झाल्यावर १५ दिवसात त्याची निविदा प्रक्रिया करणे आवश्यक असेल अशा सर्वसाधारण सूचना नियोजन विभागाने यावर्षी जारी केल्या आहे.वर्ष २०२५-२६ साठी ग्रामीण विकास अंतर्गत जनसूविधा व नागरी विकास २१ कोटी, जिल्हा आरोग्य अधिकारी १८.२ कोटी, जिल्हा शल्य चिकित्सक २८.५० कोटी, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय २० कोटी, प्राथमिक शिक्षण २८. ५० कोटी, जलसंधारण ३६ कोटी, महिला व बाल कल्याण १८. ३९ कोटी, ग्रामीण रस्ते १०५ कोटी रुपये आदीप्रमाणे नियोजन आहे. पशुधन विकासासाठी २२.२८ कोटींचा आराखडा आहे सोबतच राज्य शासन, सी.एस. आर. आणि नियोजन निधिमधून वेगळा दुग्धोत्पादन अर्थात धवल क्रांती योजना राबविण्याचा प्रस्ताव पशुधन विकास तथा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिला. तो या बैठकीत स्विकारण्यात आला. यासोबत नागरी क्षेत्र विकास ६३. ६६ कोटी, उर्जा विकास ३१ कोटी, पोलीस व तुरुंग आस्थापना १६.३५ कोटी, महसूल व आपत्ती व्यवस्थापन ७. ४३ कोटी, क्रींडागण विकास ४.२० कोटी रुपय असे नियोजन या आराखडयात आहे.

## उपमुख्यमंत्री अजित पवारांनी घेतली भेट

निवेदन:जामीनदाराची अट रद्द करावी

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ अल्पसंख्याक समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक आणि मागासपण दूर करण्याच्या हेतुने काम करत आहे. परंतु गरजू विद्यार्थ्यांसाठी जी शैक्षणिक कर्ज योजना राबवली जाते त्या योजनेची नियमावली गोरगरीब विद्यार्थ्यांना थेट कर्ज मिळवून देण्यात अडचणीची ठरू पाहात आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या अल्पसंख्यांक समाजाकडे स्थावर मालमत्ता अथवा जंगम मालमत्ता उपलब्ध नसते. परंतु विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज जेव्हा घ्यायचे असते ते व्हा त्यांच्याकडे जामीन देण्यासाठी कुठलीच मालमत्ता नसते. त्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज मिळत नाही. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी या योजनेला लागणारे मालमत्ताधारक व नोकरदार जामीनदार ही अट रद्द करावी, अशा आशयाची मागणी एका निवेदनाद्वारे मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे संचालक तथा सायं. दैनिक बीड रिपोर्टरचे संपादक शेख तय्यब यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. या वेळी शेख तय्यब यांनी गेल्या सहा महिन्यांच्या आपल्या कामाचा अहवालही उपमुख्यमंत्र्यांना सादर केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार आज बीड जिल्हा दौर्यावर आहेत. परळी येथे कार्यक्रमाच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री अजितदादा हे आले असता मौलाना आझाद आर्थिक विकास महमंडळाचे संचालक शेख तय्यब यांनी त्यांची भेट घेऊन अल्पसंख्याक समाजातील लोकांच्या अडीअडचणींवर चर्चा केली. या वेळी शेख तय्यब यांनी गेल्या सहा महिन्यांचा आपल्या कामाचा अहवालही उपमुख्यमंत्र्यांना सादर केला. संचालकपदी नियुक्ती झाल्यानंतर शेख तय्यब यांनी राज्यभर दौरा केला होता. जिल्हानिहाय जात तेथील अल्पसंख्याक समाजातील लोकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या भेटीगाठी घेतल्या होत्या. त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या होत्या. तोच अहवाल आज सादर केला. या वेळी दिलेल्या निवेदनात अजित पवार यांना दिलेल्या निवेदनात शेख तय्यब यांनी म्हटले, पान २ वर

## लोणार शहरासह तालुका अंधारात

नंदकिशोर मापारी:विद्युत विभागाच्या अधिकाऱ्याचा समन्वय अभाव

पुण्यभूमी प्रतिनिधी



लोणार:जगप्रसिद्ध लोणार शहर हे विविध समस्या चा सामना करीत असताना यामध्ये विद्युत विभागाने ही भर घातली असून दिनांक १७ मे ला सायंकाळी ४ ते ५ वाजे दरम्यान पावसाने जोरदार हजेरी लावतातच विद्युत पुरवठा बंद झाला होता .विद्युत विभागाच्या कर्मचाऱ्यांचा समन्वय नसल्यामुळे उशिराने दिनांक १८ मे च्या सकाळी ४ वाजून ३५ मिनिटांनी विद्युत पुरवठा सुरू झाला. विद्युत पुरवठा सुरळीत करण्यासाठी झालेल्या दिरंगाईची चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिवछत्र मित्र मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांनी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांच्याकडे मेल द्वारे केली आहे.

लोणार हे एक जगप्रसिद्ध पर्यटन असून या ठिकाणी विविध समस्या असताना यामध्ये विद्युत विभागाची सुद्धा भर पडली आहे. काल दिनांक १७ मे ला सायंकाळी ४ ते ५ वाजे दरम्यान विजांच्या कडकडाटासह पावसाने जोरदार हजेरी लावली . आणि लोणार चा विद्युत पुरवठा तात्काळ खंडित झाला. लोणार शहराला मेहकर १३२ के.व्ही. पारेशन मधून विद्युत पुरवठा लोणार ३३ के .व्ही .महावितरण ला केला जातो. यामध्ये पान २ वर

## परळी, बीडची गुंडगिरी संपवा

आक्रमक:अजित पवारां समोर घोषणाबाजी



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी: राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार परळी शहरात तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत होणाऱ्या वैजनाथ देवस्थानाच्या कामाची पाहणी करण्यासाठी आले होते परंतु दादांचे स्वागत परळी बंदने झाले. एका टोळक्याकडून शिवराज दिवटे या तरुणास झालेल्या अमानुष मारहाण प्रकरणी आज सर्वपक्षीय परळी बंद पुकारण्यात आला होता. मराठा समाज मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरला होता .ना. अजित दादा पवार प्रथम वैद्यनाथ मंदिर देवस्थान येथे वैजनाथाचे पान २ वर

## राज्यभरासाठी समान 'टाईप प्लॅन'

पंकजा मुंडे:पशुवैद्यकीय महाविद्यालयाचा आढावा

पुण्यभूमी प्रतिनिधी



बीड:नवीन पशुवैद्यकीय दवाखान्याचे बांधकाम करताना यापुढे राज्यभरासाठी एक सारखा असा टाईप प्लॅन तयार करण्यात येणार असल्याचे राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

उप मुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत आज जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा नियोजन विकास समितीची बैठक पार पडली, त्यावेळी ना. पंकजाताई बोलत होत्या. खरीप हंगाम पूर्व आणि जिल्ह्यातील विकास कामांचा आढावा तसेच जिल्ह्यातील महत्वाचे प्रकल्प असलेले प्रस्तावित विमानतळ, पान २ वर

### धनंजय मुंडे यांच्या मागणीला यश

परळीतील जुन्या थर्मलच्या जागेत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासह नवीन संच उभारणीचा प्रस्ताव सादर करण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आदेश दिले आहेत. माजी मंत्री ना .धनंजय मुंडे यांनी काही दिवसापुर्वी सौर उर्जा प्रकल्प उभारणीची मागणी केली होती. प्रकल्प प्रस्तावित होता. अखेर ना . अजित पवार यांनी सौर उर्जा प्रकल्पास मान्यता/आदेश दिले आहे. तसेच वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासाच्या कामांना निधीची कमतरता भासणार नाही कामे दर्जेदार पद्धतीने वेळेत पूर्ण करा असेही निर्देश अजित पवार यांनी संबंधित यंत्रणेला दिले आहेत.

खळबळ | 'युको'च्या माजी अध्यक्षाला अटक

## ६,२१० कोटीचा कर्ज घोटाळा उघड

दिल्ली:वृत्तसंस्था

अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) युको बँकेचे माजी अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक सुबोध कुमार गोयल यांना नवी दिल्ली येथील त्यांच्या निवासस्थानावरून अटक केली आहे. बँक फसवणूक प्रकरणात कॉनकास्ट स्टील अँड पॉवर लिमिटेडसह इतरांविरुद्ध सुरू असलेल्या चौकशीसंदर्भात ही कारवाई करण्यात आली. ईडीच्या कोलकाता विभागीय कार्यालयाने मनी लॉंडरिंग प्रतिबंधक कायदा (पीएमएलए), २००२ च्या तरतुदींनुसार सुबोधला अटक केली.सुबोध गोयल यांना कोलकाता येथील विशेष पीएमएलए न्यायालयाने २१ मे पर्यंत ईडी कोठडी सुनावली आहे.६,२१० कोटीचा गैरवापर केल्याचा आरोप गोयल यांच्यावर ६,२१०.७२ कोटी रुपयांच्या कर्जाच्या रकमेचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. ईडीचे म्हणणे आहे की, तपासात असे दिसून आले की, सुबोध कुमार गोयल यांच्या यूको बँकेचे अध्यक्ष आणि एमडी म्हणून कार्यकाळात यूको बँकेने सीएसपीएलला मोठी कर्जे मंजूर केली होती, जी नंतर बँकेने इतरत्र वळवली. या बदल्यात गोयलला लाच म्हणून मोठी रक्कम मिळाली.




### बनावट कंपन्यांचा वापर

लाचेचे पैसे लपविण्यासाठी गोयलने रिअल इस्टेट, लक्झरी वस्तू, हॉटेल बुकिंग इत्यादींसाठी बनावट कंपन्यांचा वापर केल्याचा आरोपही आहे. गोयलच्या आधी ईडीने डिसेंबर २०२४ मध्ये सीएसपीएलचे प्रवर्तक संजय सुरेका यांना अटक केली होती. फेब्रुवारी २०२५ मध्ये आरोपपत्र दाखल केले होते. इतकेच नाही तर ईडीने संजय सुरेका आणि सीएसपीएल यांच्या सुमारे ५१० कोटी रुपयांच्या मालमत्ताही जप्त केल्या होत्या

## अवकाळी पावसाचा बसला फटका

अस्मानी:राज्यात २७ हजार हेक्टर क्षेत्र बाधित

पुण्यभूमी प्रतिनिधी



नाशिक:राज्यभरात अवकाळी पावसाने २७ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याची माहिती कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे. अमरावती जिल्ह्यात राज्यातील सर्वाधिक १३ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. तर नाशिकमध्ये ५ हजार ८०० हेक्टर क्षेत्र बाधित आहे. राज्यात फळ पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे.राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी आज खरीप हंगाम आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी अधिका-यांना चांगलेच फटकरले आहे. बैठकीला येताना अपूर्ण माहिती असणा-या आणि गैरहजर असणा-या अधिका-यांवर कोकाटे संतापल्याचे पाहायला मिळाले. गैरहजर राहणा-या अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे आदेश जेखील कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिले आहेत. त्याचबरोबर खरीप हंगामात कोणतेही अधिकारी रजेवर किंवा संपावर जाणार नाहीत, असा इशाराही माणिकराव कोकाटे यांनी दिला आहे.

बोगस बी बियाणे खते देणा-यावर गुन्हे दाखल करणारराज्यात पान २ वर

# संपादकीय

## सौदीघरचा सौदागर!

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकताच पश्चिम आशियाचा दौरा केला. पश्चिम आशिया म्हणजे सौदी अरेबिया, कतार आणि संयुक्त अरब अमिराती. एरवी अमेरिकेचा कोणताही अध्यक्ष या भागात आला की इस्रायलला सरळवाटेने किंवा वाट वाकडी करून तरी भेट देतोच. ट्रम्प यांचा हा आखाती दौरा त्यादृष्टीने अभूतपूर्व. कारण ते इस्रायलकडे फिरकलेदेखील नाहीत! अमेरिकेच्या दृष्टीने इस्रायल हा प्राधान्याचा मुद्दा तितका राहिलेला नाही, हे यातून स्पष्ट होते. रियाध ते दोहा ते अबूधाबी असा दौरा करून ट्रम्प मायदेशी परतले, ते खंडीभर सौदे करूनच. या काळात सीरियावरील निर्बंध हटवणे नि हुथी बंडखोरांशी करार ही क्रांतिकारी पावले ठरली. इस्रायल–हमास संघर्ष, इराण अणुकरार हे मुद्दे त्यांच्या भेटीपश्चातही धुमसत आहेत. या व जगभरातील अशा युद्धनिखाऱ्यांवर व्यापारी सौद्यांचे पाणी ओतून ते विझविण्याचा प्रयत्न ट्रम्प यापुढेही करत राहणार हे नक्की. युक्रेन–रशिया संघर्ष त्यांना युक्रेनमधील खनिजांवर अमेरिकी मक्ता प्रस्थापित करूनच थांबवायचा आहे. भारत आणि पाकिस्तानमधील संघर्ष दोन्ही देशांत व्यापार गोठवण्याची धमकी देऊन थांबवता आला असा त्यांचा ठाम विश्वास. गेल्या अनेक वर्षांत एकीकडे अनेक संघर्षांच्या आगीत तेल ओतणारी अमेरिका दुसरीकडे असे संघर्ष थांबवण्यासाठीही प्रयत्न करताना दिसत होती. ते धोरण इतिहासजमा झाले. ट्रम्प यांना शांततेत रस आहे तो केवळ व्यापारापुरता. गंमत म्हणजे शांततेसाठी व्यापारमात्रा वापरणारे ट्रम्प प्रत्यक्ष व्यापाराच्या विश्वात मात्र त्यांच्या धोरणांनी अशांतता रुजवत आहेत.

पश्चिम आशियातील तीन सर्वाधिक श्रीमंत देशांची निवड त्यांनी या दौऱ्यासाठी केली हा योगायोग नव्हे. सौदी अरेबिया आणि अमेरिका संबंध खूप जुने आहेत. विशेषत: रिपब्लिकन अमेरिकी अध्यक्षांच्या अमदानीत सौदी अरेबियातले पेट्रोडॉलर्स आणि इराणविरोध हे दोन घटक ही मैत्री वृद्धिंगत करण्यास अधिक कारणीभूत ठरले होते. ओसामा बिन लादेन आणि इतर जिहादी घटकांना सौदीतून मिळालेली मदत, ९/११ हल्ला, मानवी हक्कांचा संकोच, जमाल खाशोगजीसारख्या अमेरिकी पत्रकाराची सौदी राजपुत्रानेच घडवून आणलेली हत्या अशा घटनांनी या मैत्रीत खंड पडलेला नाही. आधीचे अध्यक्ष किमान तोंडदेखले तरी या घटनांबद्दल निषेध, नाराजी व्यक्त करायचे. ट्रम्प त्यांच्यापेक्षा अधिक प्रामाणिक. 'आखाती देशांना शहाणपण शिकवायला मी आलेलो नाही', असे त्यांनी सुरुवातीलाच सांगून टाकले. अमेरिकेच्या हस्तक्षेपाने इथे विध्वंसच झाला. रियाध आणि अबूधाबीसारखी शहरे इथल्या स्थानिकांनी बांधलेली आहेत. राष्ट्रउभारणीचे दावे करणाऱ्यांनी नव्हे, असे म्हणत त्यांनी लोकशाहीवाद्यांनाही टोला लगावलाच. सौदी अरेबियाशी त्यांनी जवळपास ६०० अब्ज डॉलरचे करार केले. कतारकडून ट्रम्प यांना खास विमान मिळणार असल्याबद्दल टीका झाली. पण त्या देशाने बोइंगकडे दीडशेहून अधिक विमानांची मागणी नोंदवली. संयुक्त अरब अमिरातींशीही त्यांनी काही सौदे केले. कृत्रिम प्रज्ञा, संरक्षण, क्रीडा, गृहबांधणी आणि शहरउभारणी अशा अनेक क्षेत्रांमध्ये तीन धनाढ्य अरबी देशांशी ट्रम्प यांनी करार केले. असे करत असताना या अरब देशांच्या आणि विशेषत: सौदी अरेबियाच्या आग्रहास्तव सीरिया या आणखी एका अरब देशावरील निर्बंध हटवले. त्या देशाचा विद्यामान शासक अहमद अल शरा हा वर्षानुवर्षे अमेरिकेच्या काळ्या यादीत असलेला एके काळचा नामचीन जिहादी. त्याच्या नावावर लाखो डॉलरचे इनाम अमेरिकेनेच लावले होते. परवा त्याचा ट्रम्प आणि सौदी राजपुत्र मोहम्मद बिन सलमान यांच्या उपस्थितीत जाहीर सत्कार झाला. या अल शराचा उल्लेख इस्रायलने 'सुटाबुटातला जिहादी' असा केला होता. बशर अल असाद या इराण समर्थित सीरियन हुकूमशहाला परागंदा व्हावे लागले, त्यामुळे त्याच्या पश्चात सीरियावरील निर्बंध अमेरिकेने उठवणे हा इराणसाठीही इशाराच.

इराणच्या विद्यामान नेतृत्वाने – विद्यामान अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी – अणुकरारासंदर्भात अमेरिकेशी चर्चा करण्याची तयारी दाखवली आहे. ट्रम्प यांनीही आखाती दौऱ्यात कधीतरी 'इराण करार दृष्टिपथात आहे' असे जाहीर केले होते. प्रत्यक्षात त्यांनी किंवा त्यांच्या सल्लागारांनी पश्चिम आशियात येऊनही इराणचा विषय जवळपास बाजूलाच ठेवला. गाझामध्ये इस्रायल हल्ले थांबवण्याची थोडकीही शक्यता नाही. उलट आता गाझातील काही भागांमध्ये इस्रायली रणगाड्यांचा वावरही सुरू होईल अशी चिन्हे आहेत. एके काळी गाझा पट्टीला पर्यटनस्थळामध्ये परिवर्तित करण्याची घोषणा केलेल्या ट्रम्प यांनी ताज्या दौऱ्यात ना गाझाविषयी चकार शब्द काढला, ना संघर्ष संपवण्याबाबत इस्रायलशी बोलणी करण्याविषयी. हमासच्या ताब्यात असलेल्या एकमेव अमेरिकी ओलिसाच्या सुटकेसाठी अमेरिकेने थेट हमासच्या नेत्यांशी चर्चा केली आणि त्या ओलिसाची सोडवणूक केली. इस्रायलशी बोलण्याच्या भानगडीतच अमेरिकी पडले नाहीत. हूथी बंडखोरांवर गेल्या महिन्यात आग ओकलेल्या अमेरिकेने या महिन्याच्या सुरुवातीस अचानक त्यांच्याशी बोलणी केली आणि तात्पुरता 'समेट'ही घडवून आणला. हे करत असताना हूथींचा 'आका' ठरणाऱ्या इराणला पूर्णपणे अंधारात ठेवले. म्हणजेच आता पश्चिम आशियातील धोरणे ठरवताना ट्रम्प यांची अमेरिका धनाढ्य सुन्नी अरब गटाला केंद्रस्थानी ठेवणार याचे संकेत या दौऱ्यातून मिळाले. इराणने युरेनियम समृद्धीकरण थांबवले नाही आणि क्षेपणास्त्र कार्यक्रम मर्यादित ठेवला नाही तर त्या देशावर हल्ला करण्याची धमकी ट्रम्प यांनी मागे दिली होती. तेच ट्रम्प काही दिवसांनी इराणशी चर्चा करण्याविषयी उत्साह दाखवत होते. गाझा कारवाईच्या निमित्ताने इस्रायलने हेझबोला आणि हमासला जेरीस आणले, त्यामुळे इराणचा प्रभाव या टापूत ओसरला. तर गाझा युद्ध प्रमाणाबाहेर लांबवल्यामुळे बिन्यामिन नेतान्याहू यांचा इस्रायलही अमेरिकेच्या मर्जीतून उतरला. ट्रम्प दुसऱ्यांदा अध्यक्ष झाले, त्या वेळी त्यांना जाऊन भेटणारे पहिले राष्ट्रप्रमुख नेतान्याहूच होते. ती शिष्टाई फळली नाही हे तर स्पष्टच आहे. एप्रिलमध्ये नेतान्याहू पुन्हा ट्रम्प यांना भेटले, त्या वेळी इराणवर हल्ले करण्याची इस्रायलची योजना होती असे सांगितले जाते.

# दिव्यांग शाळा वेतनश्रेणीपासून वंचित?

## बोंबला:अजब अधिकाऱ्यांची गजब भूमिका

पुण्यभूमी प्रतिनिधी

लोणार:दिव्यांगाच्या कल्यानार्थ समाज सेवि संस्थान मार्फत दिव्यांगाच्या विशेष निवासी शाळा, ~~निवासी कर्मशाळा कार्यरत आहेत. यात दिव्यांग मुलांची~~ वसतिगृहावर सर्व प्रकारची अत्यंत महत्वाची जबाबदारी हि वसतिगृह अधीक्षक / गृहपाल यांची असते यात २४ तास त्यांना शाळा स्तरावर मुख्यालयी हजर राहणे व आपल्या सामान्य मुलांपेक्षा या विशेष मुलांची काळजी घ्यावी लागते. असे करित असतांना या वसतिगृह अधीक्षक व गृहपाल यांनी शासनाकडे जेव्हा आम्ही विशेष पदवीका धारक आहोत तसेच आम्हच्या जबाबदारी चा कालावधी व जोखीम याच शाळेत कार्यरत विशेष शिक्षकांच्या तुलनेत जास्त असल्याने विशेष शिक्षकांना मिळणाऱ्या वेतन श्रेणीनुसार वेतन मिळावे याची मागणी होऊ लागली. अनेक वेळा दिव्यांग कल्याण, आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे मार्फत वसतिगृह अधीक्षक व गृहपाल या पदाची वेतन श्रेणी सुधारणा करणे योग्य आहे

असे मत व्यक्त करण्यात आले आहे. परंतु वेळोवेळी पाठविलेल्या अहवाल त्रोतक स्वरूपाचे असल्याने परिपूर्ण प्रस्ताव वेतन त्रुटी निवारन समिती २०२४ अन्वये गठीत समितीने पाठवावा असे दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय मुंबई यांनी मा. उच्च न्यायालय यांच्या आदेशानव्ये सादर करावयाच्या पत्रात नमूद केले. सदर अहवाल पाठविण्यास दिरंगाई चीं परिसिमा ओलांडून झाल्यानंतर पण अहवाल शासनास प्राप्त होतं नसल्याने वेळोवेळी शासन स्तरावरून एकूण १२ स्मरण पत्र आयुक्त दिव्यांग कल्याण पुणे यांना या प्रकरणी देण्यात आल्याचे दिसून येत आहे. अशा परिस्थिती मध्ये या कार्यरत वसतिगृह अधीक्षक व गृहपाल यांनी आपल्याला न्याय मिळावा व त्रुटी निवारण समितीचा अहवाल तात्काळ शासनाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावा याकरिता मा. राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्याकडे मागणी धरून लावली त्यांनी पण या विषयावर सतत पाठपुरवठा केल्यानंतर शासकीय कर्मचाऱ्यांनां दप्तर दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यावर कठोर कार्यवाही व्हावी या करिता मा. मुख्यसचिव महाराष्ट्र राज्य यांना पत्र दिले. तसेच या प्रकरणी श्रीमती संगीता डावखरे सहाय्यक आयुक्त तथा अतिरिक्त कार्यभार



उपायुक्त, दिव्यांग कल्याण आयुक्तालंय पुणे यांनी मिळालेल्या अतिरिक्त कार्यभार चे सोने करत तसेच गठीत त्रुटी निवारण समिती अध्यक्ष असल्या कारणाने कोणत्याही समिती सदस्यांचे मत विचारात न घेता व अहवालावर स्वाक्षरी न घेता आपली मनमानी करत अहवाल आयुक्त दिव्यांग कल्याण यांची साथ घेत शासनाकडे पाठविला. हा अहवाल पाठवितांनी सामान्य मुलांच्या विविध विभागाच्या वसतिगृहावर काम करणाऱ्या अधीक्षकांपेक्षा दिव्यांग शाळेतील अधीक्षकांची जबाबदारी कामे कमी आहेत असे स्पष्टीकरण करून अहवाल असकारात्मक पाठविला.मग काय? खरंच दिव्यांग शाळेतील वसतिगृहावर कार्यरत अधीक्षक व गृहपाल यांच्या जबाबदारी कमी? असा प्रश्न पडला... कदाचित श्रीमती डावखरं वेगळ्या विचारांनी ग्रस्त असेल त्यामुळे दिव्यांग मुलांची तुलना सामान्य मुलांप्रमाणे केली.? सामान्य मुले अनेक कार्य स्वतः करतात तर दिव्यांग मुलांना हे करता येत नाही.. यावर जास्त सांगायचे झाले तर ज्या घरात दिव्यांग मुलं जन्माला येते त्या घरात किती मुलांचा सांभाळ करण्याच्या अडचणी येतात हे जावे त्यांच्या वंसा तेव्हाच कळे...! यावरून समजविणे चुकीचे होणार नाही. मुळात जर दिव्यांग शाळाची आवश्यकता नसती तर एवढ्या कमी शाळांकरिता स्वतंत्र दिव्यांग कल्याण आयुक्तालंय वं त्यात श्रीमती डावखर यांच्या सारख्या अधिकारी यांना पण शिक्षण विभागात जेवढ्या शाळा आहेत तेवढ्या शाळा दिव्यांग कल्याण ला नसल्यामुळे यांची राज्यस्तरावर जबाबदारी कमी आहे. त्यामुळे यांचा बेसिक इतर सहाय्यक आयुक्त च्या तुलनेत कमी व्हावा हे उचित होईल अशी दिव्यांग शाळा वसतिगृह अधीक्षक व कार्यरत गृहपाल यांची धारणा आहे. राज्य शासनाने दिव्यांग कल्याण विभाग वेगळं करून काहीही तिर मारलेला नसून या विभागाची प्रगती व विस्तारिकरणं करण्यात अशाच लालची वं सूडबुद्धीने काम करणाऱ्या लोकांमुळे राज्यात खालच्या स्तराला नेवून ठेवलेले आहे. या विभागाला स्वतंत्र मंत्री वं राज्यमंत्री पण नाही अनेक वर्षांपासून या विभागाला मुख्यमंत्री महोदय स्वतःकडे ठेवतात या विभागाला न्याय देण्यासाठी वं अडचण दूर करण्याच्या दृष्टीने सतत पत्रव्यवहार हा कचऱ्याच्या ढीगाऱ्यात पडलेला दिसतो... मग न्याय कसे मिळणार. महाराष्ट्र राज्य दिव्याग शाळा / कर्मशाळा संलग्न वसतिगृह अधिक्षक महासंघ. प्रवीण अवसरमोल महाराष्ट्र राज्य अपंग शाळा कर्मशाळा व अधीक्षक संघटना जिल्हा प्रतिनिधी

पान एक वरून

**उपमुख्यमंत्री अजित पवारांनी**

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत अल्पसंख्यांक समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक, मागासपण दुर करण्याहेतू आजपावेत काम करत आले आहेत. गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येत आहे. परंतु या योजनेसाठी जी नियमावली आहे ती अल्पसंख्यांक समाजातील गोर–गरीब, विद्यार्थ्यांसाठी अडचणीची ठरू पाहत आहे. आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकडे स्थावर मालमत्ता, जंगल मालमत्ता अथवा अन्य कुठलेही साधन जामीन देण्यासाठी त्यांच्याकडे उपलब्ध नाही. परिणामी विद्यार्थ्यांना जेव्हा शैक्षणिक कर्ज घ्याव्याचे असते तेव्हा केवळ जामीन देण्यासाठी त्यांच्याकडे कुठलीच मालमत्ता नसल्याने ते शैक्षणिक कर्जापासून वंचित राहतात. मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना ही अल्पसंख्यांक समाजातील गरीबांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक दृष्टया मागासपण दुर करण्याच्या उदात हेतुतून झाली आहे. राज्य शासनाने या महामंडळाच्या अंतर्गत अनेक कामे हाती घेतलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देणे होय. केवळ गरीब विद्यार्थ्यांना जामीनीसाठी काही उपलब्ध नाही म्हणून महामंडळाचा आणि विद्यार्थ्यांचा हेतू साध्य होत नाही. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कर्जाबाबत ज्या काही अटी महामंडळाने आखल्या आहेत. त्या रद्द करून विद्यार्थ्यांच्या सिबीलवर कर्जदारा विद्यार्थ्यांचे नाव टाकण्यात यावे अथवा त्यांच्याकडून लिखित बॉन्ड करून घ्यावा. आत्ताच केंद्र सरकारने नव उद्योग करणार्यांसाठी कर्ज योजना वाढवली आहे. त्यामध्ये नवउद्योग करणार्या उमद्या तरूणाला कर्ज देतांना त्या कर्जाची जिम्मेदारी थेट केंद्रसरकाने घेतली आहे. त्या धर्तीवर अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी कर्ज देतांना महामंडळाला शासन त्यांच्या कर्जाची जबाबदारी घेता येईल का या बाबतही विचार व्हावा विद्यार्थ्यांना कर्ज देतांना जामीनदारांचे जी अट ठेवण्यात आली आहे ती रद्द करण्यात यावी, असे म्हणत महामंडळाने असे क्रांतीकारी निर्णय घेतल्यास अल्पसंख्यांक समाजातील गोर गरीब विद्यार्थ्यांची उन्नतीबरोबर शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक मागासपण दुर होण्यास मदत होईल.

**लोणार शहरासह तालुका**

मेहकर वरून लोणार कडे दोन फिडर असून एक फिडर सुलतानपूर तर दुसरे फिडर लोणार आहे . यामध्ये सुलतानपूर फिटर वडगाव तेजन पर्यंत सुरळीत सुरू होते .परंतु लोणार फिटरवर तांत्रिक अडचणी यामध्ये इन्सुलेटर( चिनीमातीच्या तबाकडे) फुटलेल्या होत्या . तो पहिला फॉल्ट (दोष )रात्री ९ ते १० वाजे दरम्यान दुरुस्त करण्यात आला . परत ट्रिपिंग घेण्यात आली असता ११ वाजे दरम्यान दुसरा फॉल्ट (दोष) आढळला . त्यामध्ये सुद्धा इन्सुलेटर (चिनीमातीचे तबकड्या फुटलेल्या) होत्या तोही दोष रात्री १२ वाजे दरम्यान दुरुस्त करण्यात आला .परंतु मिळालेल्या माहितीनुसार मेहकर पारेषण विभाग आणि लोणार वितरण विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा समन्वय नसल्यामुळे मेहकर येथील पारेषण विभागातील कार्यरत असलेली महिला कर्मचारी यांनी वितरण चे लोणार विभागाचे उपविभागीय अधिकारी शेंडे यांना आपण नियमानुसार परमिट घ्यावे त्यानंतर ट्रिपिंग घेतल्या जाईल असे सांगितले. हे सर्व संभाषण भ्रमणध्वनीवर केल्या जात होते. विद्युत पुरवठा सुरळीत करण्यास नकार दिल्या नंतर शेवटी वितरणचे उपविभागीय अधिकारी शेंडे आणि शहर अभियंता विद्युत विभाग वितरण बोबडे यांनी १३२ के.व्ही पारेषण वर कार्यरत असलेल्या सब स्टेशन वरील महिला कर्मचाऱ्यास विनंती करून सकाळी ४ वाजे दरम्यान विद्युत पुरवठा लोणार पर्यंत सुरळीत सुरू करण्यात आला . त्यानंतर लोणार शहराला दिं १८ मे ला सकाळी ४ वाजून ३५ मिनिटांनी पुरवठा सुरळीत करण्यात आला या विलंबाला जे अधिकारी कर्मचारी कारणीभूत आहेत . त्यांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी शिवछत्र मित्र मंडळाचे अध्यक्ष नंदकिशोर मापारी यांनी मेलद्वारे मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री यांच्याकडे केली आहे. मेहकर १३२ के .व्ही. वरून लोणार कडे ३३ के .व्ही ला येणारी लाईन ही मेहकर ते सुलतानपूर पर्यंत मुख्य रस्त्याला लागून असल्यामुळे त्यावर काही फॉल्ट किंवा दोष असल्यास तात्काळ शोधता येतो . परंतु सुलतानपूर ते लोणार कडे येणारी लाईन ही मुख्य रस्त्यापासून एक ते दीड किलोमीटर आत शेतामध्ये असल्यामुळे रात्री अपरात्री पावसामध्ये जाऊन फॉल्ट किंवा दोष शोधणे कठीण जाते . ही लाईन चाळीस ते पन्नास वर्षापासून अडचणीची झाली आहे . त्यामुळे ही दीड किलोमीटर शेतामध्ये असलेली लाईन सुलतानपूर ते लोणार पर्यंत मुख्य रस्त्याला लागून असल्यास भविष्यामध्ये काही फॉल्ट किंवा दोष असल्यास तात्काळ दुरुस्त करता येईल. अशी मागणी रात्री अपरात्री काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची आहेत्यामुळे यावर वरिष्ठांनी लक्ष देण्याची गरज आहे. संबंधित वितरणचे उपविभागीय अधिकारी शेंडे हे लोणार ला कार्यरत असताना ते मेहकर येथे मुक्कामी असतात त्यामुळे लोणार मध्ये विद्युत ची अडचण आल्यास प्रत्येक वेळी विलंब लागतो . त्यामुळे त्यांनी मुख्यालयी राहावे अशी मागणी होत आहे.

**परळी, बीडची गुंडगिरी**

दर्शन घेऊन काम आराखडा पाहणी केली , दरम्यान अधिकाऱ्यांना त्यांनी काही सुचना केल्या . त्या ठिकाणाहून ना . अजित पवार हे शासकीय अतिथीगृह येथे गेले असता शिवराज दिवटे च्या न्याय समर्थनार्थ निघालेल्या अंदोलकांनी अतिथीगृहा समोर अजित पवारांच्या नावे ' अजित दादा आवाज ऐका , शिवराज ला न्याय द्या , परळी व बीड जिल्ह्यातील गुंडगारी संपवा अशा घोषणाबाजी केली दरम्यान अजित पवार यांनी बाहेर येत अंदोलकांचे निवेदन स्विकारले. परळी शहर दुपारी १२ वाजेपर्यंत कडकडीत तर दुपार नंतर समीश्र बंद राहिले. दोन मराठा अंदोलक देवराव लुगडे महाराज व केशव साबळे यांना परळी शहर पोलीसांनी नजरकैदेत ठेवले होते. या दौऱ्यात बीड जिल्ह्यात वाढत असलेल्या संघटित गुन्हेगारीवर आणि पोलीस प्रशासनाच्या भूमिकेवर ह्या दौऱ्यात अजितदादा काय भूमिका घेतात याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते .दरम्यान रीतसर निवेदन दिल्यानंतरही परळी पोलिसांनी बंद चिरडण्यासाठी बळाचा वापर केला व बंदचे आवाहान करणाऱ्या संयोजकांनाच अजितदादा येणार असल्याने नजर कैदेत ठेवत पोलिसांनी लोकशाहीचा गळा दाबण्याचे काम केले आहे. परळी तालुक्यातील लिंबूटा गावचा तरुण शिवराज नारायण दिवटे याला झालेल्या अमानुष मारहाणीच्या निषेधार्थ व सर्व आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करावी या मागणीसाठी सोमवार दिनांक १९ मे रोजी परळीकरांच्या वतीने परळी बंदच आव्हान करण्यात आले होते. या बंदमध्ये सर्वांनी सहभागी होऊन या घटनेचा निषेध करावा असे आवाहन करण्यात आले होते.दरम्यान महाराष्ट्राचे अर्थमंत्री तसेच उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार अजित दादा पवार दिनांक १९ रोजी शहरात आल्यानंतर ते वैद्यनाथ मंदिरात प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेऊन नंतर तीर्थक्षेत्र विकास कामांची पाहणी केल्यानंतर चेमरी रेस्ट हाऊस येथे बैठक घेतली . या बैठकीस विद्यमान मंत्री ना. पंकजाताई मुंडे व माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे हे सुद्धा उपस्थित होते. सध्या महाराष्ट्रात शिवराज दिवटे मारहाण प्रकरण गाजत असल्यामुळे आणि परळी बंद असल्यामुळे नामदार अजितदादा पवार यांचे स्वागत जोरदारपणे करण्याची संधी मात्र राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना मिळाली नाही. तसेच एकूणच बीड जिल्ह्यात वाढत असलेले गुंडागर्दी आणि संघटित डोळ्यांचा उच्छाद यावर अजित दादा पवार काय भूमिका मांडतात आणि पोलिसांना काय आदेश देतात याकडे संपूर्ण बीड जिल्ह्याचे लक्ष लागून होतेच. दरम्यान शिवराज दिवटेस अमानुष मारहाण झाल्यानंतर दिनांक १७ मे रोजी या घटनेचा निषेध करण्यासाठी आणि आरोपींवर कठोर कारवाई करावी या मागणीसाठी सर्व पक्षीय परळी बंदचे आवाहन केले होते.तरीही आज सकाळी बंद सुरू होण्यापूर्वीच पोलिसांनी देवराव लुगडे महाराज व केशव साबळे या संयोजकांना ताब्यात घेऊन संभाजीनगर पोलीस स्टेशनच्या आवारात नजर कैदेत ठेवले होते.

**राज्यभरासाठी समान**

अहमदनगर–बीड–परळी रेल्वेमार्ग, कृषी महाविद्यालय परळी, बिंदुसरा स्वच्छता, जिल्हा क्रीडा संकुल, शासकीय इमारती आदी विविध विषयांचा आढावा यावेळी बैठकीत घेण्यात आला.यावेळी बैठकीत बोलताना ना. पंकजाताई म्हणाल्या, अनेक ठिकाणी पशुवैद्यकीय महाविद्यालयाला नवीन इमारतींची गरज आहे. यापुढे नवीन पशुवैद्यकीय दवाखान्याच्या इमारतींचे बांधकाम करत असताना संपूर्ण राज्यभर एक सारखा असा टाईप प्लॅन तयार करून इमारती बांधल्या जातील.

**बीड,जालन्यात विशेष तरतूद**

बीड व जालना जिल्ह्यात नवीन पशुवैद्यकीय दवाखाना बांधण्याकरिता राज्य स्तरावरून निधीची विशेष तरतूद करण्यात येईल असं ना. पंकजाताई मुंडे यावेळी सांगितलं. परळी येथे होत असलेल्या नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रस्तावित कामाचा बैठकीत आढावा घेण्यात आला.

**अवकाळी पावसाचा बसला**

खतांचा मोठ्या प्रमाणांत बफर स्टॉक असल्याची माहितीही माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे. खते आणि बियाणांचं लिंकिंग कोणी करणार नाही याच्या सक्त सूचना राज्यभरातील कृषी केंद्रांना दिल्या आहेत. बोगस बी बियाणे खते देणा–यावर गुन्हे दाखल केले जाणार असल्याचा इशारा देखील मामिकराव कोकाटे यांनी दिला आहे. येत्या काही दिवसात कृषी अधिका–यांच्या बदल्या केल्या जातील असेही ते म्हणाले.जे अधिकारी जाणूनबुजून गैरहजर राहणार असतील याबाबत मुख्यमंत्र्यांच्या कानावर विषय टाकणार असल्याचे माणिकराव कोकाटे म्हणाले. आधी कळवणार नसतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल असेही कोकाटे म्हणाले. शासनाने आश्वासन दिल्यानंतरही जर कोणी संपावर जाणार असतील तर त्यांच्यावरही कारवाई केली जाणार आहे.

**रजेवर, संपावर न जाण्याच्या सूचना :** खरीप हंगामात कोणताही अधिकारी रजेवर किंवा संपावर जाणार नसल्याच्या सूचना माणिकराव कोकाटे यांनी दिल्या आहेत. संप पुकारून शेतकरी आणि सरकारला कोणीही वेठीस धरणार नाही, अन्यथा प्रशासकीय कारवाई केली जाईल असा इशारा कोकाटे यांनी दिला आहे. दोन दिवसांनी मुख्यमंत्रीच्या अध्यक्षतेखाली बैठक होणार आहे. त्यावेळेस कृषी विभाग तयार असल्याचे आश्वासन मी त्यांना देणार असल्याचे माणिकराव कोकाटे म्हणाले.

पान सहा वरून

**पंचायत समितीने लुबाडने थांबवावे**

श्री डोंगरे यांना दाखवून त्याबाबत भ्रष्ट अधिकारी यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करुन तात्काळ लूट थांबवण्याची मागणी केली, परंतु गट विकास अधिकारी यांनी स्पष्ट भूमिका न घेतल्यामुळे संतृप्त शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी भाई ड.नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली पंचायत समितीच्या मुख्य द्वारावर रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचाराचे दर डकवुन पंचायत समिती प्रशासना विरोधात बोंबा मारत निषेध केला.या वेळी शेतकरी कामगार पक्षाचे भाई ड.नारायण गोले पाटील,भाई मुंजा पांचाळ, भाई श्रीराम शेवाळे, जयराम राऊत,करण थोरात, परमेश्वर डाके आदींची उपस्थिती होती

**सीबीएसईकडून समन्वयकपदाची धुरा**

पब्लिक स्कूलचे अध्यक्ष आमदार प्रकाशदादा सोळंके, सचिव मंगलाताई सोळंके, उपाध्यक्ष वीरेंद्र सोळंके, समन्वयक महिला देशमुख, उपप्राचार्य राहुल कदम, शैक्षणिक विभाग प्रमुख जीबी ऑगस्टन, सुनिता सुरवसे, धनंजय सोमवंशी, अर्चना जाधव, देवेंद्र सोळंके, प्रदीप बुरकुल यांच्यासह सर्व पालकवृंद, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्राचार्य अन्वर शेख यांचे अभिनंदन केले.

**गुणवंतांच्या पाठीवर कौतूकाची**

सत्कार करण्यात आला. त्यात पैकीच्या पैकी गुण घेऊन संस्कृत विषयात अव्वल स्थान प्राप्त करणारे अक्षरा शेळके.१००,ओम शेळके १०० ,इखे अशितोष १००,कसपटे अनुष्का १००,अव्वल स्थानापासून एक गुणानि दुर असनारे पांगळ मोहित ९९,काळे सई ९९, खंडागळे तृप्ती ९९,आर्यन गिरी ९९,कसपटे हर्षदा ९९,जाधव तन्मय ९९,जाधव सिद्धि ९९,पवार आनंद ९९,श्रेया इंगळे ९९ ,वाघमारे वैशाली ९९ ,जाधव यश ९९,आणि इतर ९० पेक्षा जास्त मार्कस् घेण्या–या विद्यार्थ्यांचा देखील सत्कार करण्यात आला तसेच एस.आर.पी.एफ.च्या परीक्षेत यश मिळवलेल्या अभिजीत दिलीप तेलंग या विद्यार्थ्यांचा देखील सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला पालक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश शिंदे यांनी तर प्रास्ताविक बळीराम कवडे आणि आभार प्रदर्शन लहाने सरांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी वंदिता कोठावळे,प्रांजल चौधरी,तन्मय गंभीरे,ऋषी गंभीरे इ.विद्यार्थ्यांनी प्रयत्न केले.

**थर्मलच्या जागेत सौर ऊर्जा**

तीर्थस्थळाच्या व परिसराच्या विकासासाठी राज्य सरकारकडून २८६.६८ कोटी रुपयांच्या आराखड्यास मान्यता दिल्यात आलेली असून यातून विविध विकास कामे सुरू आहेत. या कामांना निधीची कमतरता कुठेही भासू देणार नाही मात्र अत्यंत दर्जेदार पद्धतीने व ठराविक वेळ येथे कामे पूर्ण केली जावीत असे अजित दादांनी स्पष्ट केले.

बैठकीस अजितदादांसह मंत्री पंकजाताई मुंडे, माजी मंत्री धनंजय मुंडे, आयुक्त राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांसह संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते. दरम्यान धनंजय मुंडे यांनी या मागणीस सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल उपुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत.

**वर्गमित्रांची पून्हा**

आयोजन करण्यात आले होते.दुसऱ्या सत्रात प्रत्येकांनी आपापले मनोगत व्यक्त करून ओळख करून दिली त्यानंतर मनोरंजन म्हणून संगीत खुर्ची, खो–खो अशा विविध खेळांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अरविंद शिंदे, मोहन बंडे, कैलास गोरे निळकंठ काकडे, शंकर पवार, सचिन गोरे, निजाम शेख,पदमाकर जाधव,लक्ष्मण गोरे, सलोकता काळे, अर्चना गोरे, वैशाली खोडसे व गेट–टुगेदर ग्रुपच्या सर्व सदस्यांनी तसेच महाराष्ट्र विद्यालय बनसारोळा शाळेचे मुख्याध्यापक व सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

**मान्सूनपूर्व विद्युत दुरुस्त्या**

सुरू होण्यापूर्वी विद्युत पुरवठ्यात आडथळे येऊ नयेत, दुर्घटना घडू नये याची खबरदारी म्हणून मॅटनेन्स करण्यात येते. यामध्ये विद्युत पोलवरील लोंबकाळलेल्या तारा ताणून घेण्यासह झुकलेले पोल व्यवस्थित करणे, त्याचबरोबर तारांवर आलेल्या झाडाच्या फांद्या तोडून काढणे यासह इतर दुरुस्त्याची कामे करून घेतली जातात. या कामासाठी लाखो रुपयांचा खर्च केला जातो. मात्र ज्या ठिकाणी मॅटनेन्स करणे आवश्यक आहे, अशा ठिकाणची कामे केली जात नसल्याचे निदर्शनास येत असल्याने यंदा देखभाल व दुरुस्तीची कामे हाती घेण्यात आली. नाहीत का? असा प्रश्न उपस्थित केला जातो आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई-मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# सर्व पक्षीय शिष्टमंडळ, भारताची एकजूट

पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतीय महिलांच्या कपाळाचे कुंकू पुसल्याबद्दल त्यांना अद्दल घडवण्यासाठी मोदींनी पाकविरुद्ध जोरदार युद्धसदृष्य हालचाली केल्या आणि शंभर दहशतवाद्यांना कंठस्नान घातले. मुरीदके, बहावलपूर आदी ठिकाणच्या दहशतवादी अड्ड्यांवर लष्कराने जोरदार हल्ले चढवून दहशतवाद्यांना ठार केले. त्यातच कंदाहार येथील विमान अपहरण प्रकरणात हवा असलेला दहशतवादी अझर मसूद याचे कुटुंबीय मुरीदके येथील हल्ल्यात ठार झाले. लष्कराच्या हल्ल्यात पाकचे दहशतवादी आणि पाकचे सैनिकही ठार झाले आणि पाकला चांगलाच धडा शिकवला गेला. पाकने शरणागती पत्करली आणि पाक दाती तृण धरून शरण आला. पण मोदी यांनी आता पाकला राजनैतिक पातळीवरही नामोहरम करण्याचे धोरण स्वीकारले आहे आणि त्यांनी हा राजनैतिक सर्जिकल स्ट्राईक अत्यंत जोरदार केला आहे.

पाकचे प्रथम पाणी बंद केले, नंतर पाकला जाणारी निर्यात थांबवली आणि आता तर तुर्कस्थानला धडा शिकवला आहे कारण त्याने पाकला मदत केली याचे प्रायश्चित्त त्याला देण्यात आले आहे. त्याच्याशी सर्व प्रकारचे संबंध तोडून आणि त्याच्याशी असलेले आर्थिक संबंध तोडून पण पाकसाठी हे पुरेसे नाही, कारण पाक कधीही आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताला काही करू शकत नसला तरीही भारताला त्रास देत रहाणार हे ओळखून मोदी यांनी आता हा राजनैतिक ऑफेन्सिव्ह म्हणजे पाकचे सर्वकंष पर्दाफाश करण्याचा निर्णय घेतला आहे. हा मोदी यांचा मास्टर स्ट्रोक आहे. या सीझफायरमध्ये भारत ड्रोन्स किंवा क्षेपणास्त्रे डागणार नाही, तर पाकला पुरता एक्सपोझ करणार आहे. भारत आता सात उच्च शक्तीशाली पक्षांची शिष्टमंडळे जगातील विविध प्रमुख देशांना पाठवणार आहे आणि त्यांना हे पटवून देणार आहे की भारत हाच पाक पुरस्कृत दहशतवादाचा शिकार झालेला देश आहे. या शिष्टमंडळाचे नेतृत्व चार एनडीएचे खासदार आणि तीन विरोधी पक्षांचे खासदार करणार आहेत. हे शिष्टमंडळ जगातील प्रमुख आंतरराष्ट्रीय राजधान्यांमध्ये जाऊन सीमावर्ती दहशतवादाविरोधात प्रबळ सहमती तयार करण्याचा प्रयत्न करेल. या डावपेचात्मक चालीमागे भारताची राष्ट्रीय ऐक्य जगासमोर एकसंधपणे आणण्याचा हेतू तर आहेच पण असा एक संदेश जगभर देण्याचा प्रयत्न आहे की, भारत यापुढे कोणत्याही प्रकारचा दहशतवाद सहन करणार नाही आणि जागतिक नेत्यांनी याची दखल घ्यावी. यामुळे जागतिक नेते भारताच्या या कृत्याची दखल घेऊन पाकविरोधात ही भारताची पुढील कृती विचारात घेतील आणि पाकच्या कोणत्याही दुस्साहसाला पाठिंबा देणार नाहीत.

सर्व पक्षीय शिष्टमंडळ भारताची राष्ट्रीय सहमती आणि दहशतवादाला कोणत्याही स्वरूपात मुकाबला करण्याचे भारताचे धोरण जगासमोर आणतील. दहशतवाद कोणत्याही स्वरूपातील आणि आविष्कारातील हा भारतासाठी अस्वीकारार्ह आहे हे पटवण्याचा हे नेते करतील. देशाचा जो संदेश आहे की, कोणत्याही प्रकारचा दहशतवाद सहन करणार नाही हा संदेश जगाला देतील. दुसरे म्हणजे देशांतर्गत लोकांना भारताच्या या कृतीत सर्व पक्ष सहभागी आहेत हा एक मोठा संदेश देण्याचा प्रयत्न मोदी सरकारचा आहे. हा अतिशय स्तुत्य प्रयत्न आहे. कारण विरोधी पक्षांकडून सरकारवर जी संभाव्य टीका होणार आहे ती आपोआपच खाली बसेल आणि सरकारविरोधात आक्षेप घेणाऱ्यांना परस्परच उत्तर मिळेल. ऑपरेशन सिंदूरनंतर भारतीयांची सूडाची इच्छा काही अंशी पूर्ण झाली आहे पण भारतातील काही 'आस्तिनके साप' आहेत त्यांची वळवळ या निमित्ताने समोर आली होती.

ती आता थंड होणार आहे. त्यातल्या त्यात अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मध्यस्थी केली असा जो आरोप मोदी सरकारवर केला जातो तो धुऊन काढण्याचा सरकारचा निर्धार आहे आणि तो या कृतीने बराचसा साध्य होणार आहे. या पूर्वीही भारताने असाच प्रयोग केला होता आणि भारतातील राजकीय पक्ष संकटाच्या समयी एक होतात असा जो संदेश गेला होता त्याला पुष्टी मिळाली आहे.

या आधी तत्कालीन पंतप्रधान नरसिंह राव यांनी जिनिव्हाला पाठवण्यासाठी शिष्टमंडळाच्या नेतेपदी तत्कालीन विरोधी पक्ष नेते अटलबिहारी वाजपेयी यांची निवड केली होती. पाकने आणलेल्या ठरावावर भारताची भूमिका प्रबळपणे मांडण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघात भारताची भूमिका अधिक प्रबळ करण्यासाठी १९९४ मध्ये हे शिष्टमंडळ जिनिव्हाला गेले होते. या शिष्टमंडळात तेव्हाचे काश्मीरचे मुख्यमंत्री आणि सध्याचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला याचे वडील, सलमान खुर्शिद आणि मनमोहन सिंग तसेच ई अहमद यांचा समावेश केला होता. तोच संदेश मोदी सरकारने देण्याचा प्रयत्न केला आहे आणि यामुळे या शिष्टमंडळात शशी थरूर, रवीशंकर प्रसाद, संजय कुमार झा, वैजयंत पांडा, कनिमोझ, सुप्रिया सुळे आदींचा समावेश करणार आहे. या शिष्टमंडळाचे नेतृत्व करण्यासाठी काँग्रेसचे शशी थरूर यांची निवड झाली आणि त्यामुळे राहुल गांधी याचा पोटशूळ उठला.

कारण काँग्रेसने मोदी सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध केला पाहिजे असे त्यांचे धोरण आहे, पण राहुल यांचे हे धोरण थरूर असोत की काँग्रेसला फारसे पसंत नाही, त्यामुळे थरूर हे शिष्टमंडळात सामील झाले आणि त्यांनी नेतृत्व करण्याचे मान्य केले आहे. पण ते असो. अशा संकट समयी तरी आपसतील मतभेद समोर आणू नयेत असे शिष्टाचार सांगतो. पण काँग्रेस आणि त्यापेक्षाही पाकिस्तानची भाषा बोलणाऱ्या राहुल यांना ते मान्य नाही. पण किरण रिजिजू म्हणाले ते या क्षणी महत्वाचे आहे. ते म्हणजे संकट समयी आम्ही एकजूट आहोत आणि हे जगाला दाखवण्याची हीच अत्यंत योग्य वेळ आहे. दहशतवादाबद्दल शून्य सहिष्णुता असा संदेश घेऊन हे शिष्टमंडळ महत्त्वाच्या ठिकाणी फिरणार आहे आणि ही बाब सर्वात महत्त्वाची आहे. प्रमुख भागीदार राष्ट्रांना भेट आणि भारताच्या राष्ट्रीय एक्याचे प्रतिबिंब मतभेदांच्या पलीकडे जाऊन आहे हे सर्वात महत्त्वाचे आहे. अशा अवघड समयी भारत एकजूट आहे हे जगाला दाखवणे जास्त महत्त्वाचे आहे.

# मुंबई-ठाणे जिल्ह्यात एकनाथ शिंदे यांची प्रतिष्ठा पणाला...!

सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील महापालिकांसह मुदत संपलेल्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या चार महिन्यांच्या आत घेण्याचे निर्देश दिल्यानंतर राज्यातील वातावरण पालिका निवडणुकीसाठी हळूहळू तापायला सुरुवात झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या नेत्यांपेक्षा देखील स्थानिक कार्यकर्त्यांसाठी आणि त्यांच्या राजकीय भवितव्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असतात. जुलै २०२२ मध्ये शिवसेनेत उठाव करून महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडवलेल्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी त्याचप्रमाणे शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसाठी आगामी महापालिका, नगर परिषदा, जिल्हा परिषदा त्याचप्रमाणे पंचायत समित्यांच्या निवडणुकादेखील अत्यंत महत्त्वपूर्ण तसेच प्रतिष्ठेच्या आहेत. आता स्थानिक महापालिका असेल, नगर परिषद असेल अथवा जिल्हा परिषद, पंचायत समिती असतील या स्थानिक स्वराज्य संस्थांवर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा झेंडा फडकणे ही सर्वसामान्य शिवसैनिकांसाठी त्याचप्रमाणे एकनाथ शिंदे यांच्यासाठी देखील एक मोठी अग्नी परीक्षा असणार आहे.

महाराष्ट्रात भाजपा शिवसेना आणि अजित पवार यांचे राष्ट्रवादी यांच्या महायुतीचे सरकार राज्यात सत्तेवर आहे तर केंद्रामध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडी यांचे सरकार सत्तेत आहे. लोकसभा निवडणुकीचे तंत्र वेगळे असते त्याचप्रमाणे विधानसभा निवडणुकीचे तंत्र देखील वेगळ्या असते. मात्र या दोन्हींपेक्षा महापालिका नगर परिषदा, जिल्हा परिषदा, पंचायत समिती अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकण्याचे तंत्र हे गेल्या काही वर्षांमध्ये झपाट्याने बदलले आहे आणि हा बदल हा प्रामुख्याने भाजपाने त्याचप्रमाणे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्या पाठोपाठ दुसरे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादीने निश्चितच विरोधी पक्षांपेक्षा अधिक सजगतेने आणि सक्षमपणे आत्मसात केलेला आहे. तथापि महायुतीची ताकद ही विरोधकांपेक्षा अनेक पटीने अनेक जिल्ह्यांमध्ये अधिक असली तरी देखील स्थानिक राजकारणाची गणिते ही स्थानिक पातळीवरील राजकीय आघाड्या छोट्या-छोट्या पक्षांशी होणाऱ्या युती तसेच अपक्षांचे प्राबल्य अशा प्रामुख्याने त्या शहरातील स्थानिक राजकीय स्थितीवर राजकीय पक्षांच्या यशाची अथवा अपयशाची गणिते ही अवलंबून असतात. सर्वात उल्लेखनीय म्हणजे स्थानिक निवडणुकांमध्ये मतदार हे प्रामुख्याने कोणत्याही एका विशिष्ट राजकीय पक्षापेक्षा त्यांच्या अधिक जवळचा उमेदवार कोण आहे याला अधिक प्राधान्य देत असतात हे यापूर्वीच्याही स्थानिक पातळीवरच्या निवडणुकीच्या निकालांवरून वारंवार स्पष्ट झालेले आहे. त्यामुळेच दोन दिवसांपूर्वी पुण्यामध्ये बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीबाबत जे भाष्य केले आहे ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या आनुषंगाने महत्त्वपूर्ण आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असे म्हणतात की, स्थानिक संस्थांच्या निवडणुका या महायुती म्हणून लढवण्यावर आमचा भर असणार आहे. तथापि स्थानिक संस्थांच्या निवडणुका या खऱ्या अर्थाने कार्यकर्त्यांच्या निवडणुका असल्यामुळे जे कार्यकर्ते पाच-पाच, दहा वर्षे स्थानिक पातळीवर पक्षाला यश मिळवून देण्यासाठी सक्रिय असतात अशा कार्यकर्त्यांना न्याय देता यावा म्हणून अपवादात्मक स्थितीमध्ये वेगळा निर्णय घ्यावा लागला तर तो देखील घेता येऊ शकतो. यावरून एक गोष्ट ही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केली आहे ती म्हणजे ज्या महापालिकेमध्ये अथवा जिल्हा परिषदेमध्ये भाजपाकडे इच्छुकांची संख्या मोठ्या प्रमाणावर असेल त्या



महापालिकेसाठी भाजपा स्वतंत्र लढण्याचा विचार करू शकते. महायुतीमध्ये भाजपाचे स्वतंत्रपणे स्वबळावर काही महापालिकांमध्ये निवडणुकीला उभा राहिला तर अशा वेळेला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसमोर आणि त्याचबरोबर पश्चिम महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या बाबतीत दुसरे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी समोर भाजपाशी मैत्रीपूर्ण लढतीचा प्रस्ताव पुढे येऊ शकतो.

## महाराष्ट्रनामा

अर्थात राजकीय भाषेमध्ये जरी जेव्हा सत्ताधारी पक्षांमधील युती, आघाडीमधील मित्रपक्ष हे जेव्हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये परस्परांच्या विरोधात उभे ठाकतात तेव्हा त्यावेळी तेथे मैत्रीपूर्ण लढत हा गोंडस शब्द असला तरी प्रत्यक्षात स्थानिक पातळीवरचा संघर्ष हा अधिक जोरदारपणे होत असतो. त्यामुळे पुण्यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत व्यक्त केलेली भावना ही निश्चितच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसाठी ही काहीशी धक्कादायक आहे असेच म्हणावे लागेल. धक्कादायक हे यासाठी कारण राज्याच्या सत्तेची सर्व सूत्रे हे अखेरीस राज्याचे मुख्यमंत्री ज्या पक्षाचे असतात त्या मुख्यमंत्र्यांकडेच सरकार यंत्रणेचे सर्व नियंत्रण असते.. त्याचबरोबर दुसरी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घ्यावी लागणार आहे ती म्हणजे भाजपाने यापूर्वी शिवसेना एक संघ असताना स्थानिक पातळीवरच्या जागावाटपावरून बऱ्याच वेळा स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतलेला आहे. आणि निवडणुकीनंतर मग पुन्हा भाजपा आणि शिवसेना यांची युती होऊन महापालिकांमध्ये युतीमार्फत सत्ता चालवण्यात आलेली आहे. हे सांगण्याचे प्रमुख प्रयोजन म्हणजे जर भाजपाचे राजकीय नेतृत्व हे जागा वाटपामध्ये स्वतःच्या अटी शर्तीनुसार जर जागावाटप युतीमध्ये होत नसेल अशा वेळेला एकसंघ शिवसेनेच्या नेत्यांना स्थानिक पातळीवर बाजूला करून नवीन स्थानिक राजकीय समीकरणे निर्माण करण्यास धजावत असतील, तर मग आता तर एक संघ शिवसेनेचे दोन भाग झालेले आहेत आणि भाजपाबरोबर सत्तेत असलेले एकनाथ शिंदे आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना ही दुभंगलेल्या शिवसेनेचे प्रतिनिधित्व करत आहे अशा बदललेल्या राजकीय परिस्थितीमध्ये भाजपाचे नेते हे प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या निमित्याने राज्यात भाजपा अधिकाधिक कसा विस्तारेल याचीच काळजी अधिक घेतील हे ओघाने आलेच.

भाजपची ही जर एकूणच निवडणुकीची रणनीती लक्षात घेतली, तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी जिथे ते महायुती म्हणून निवडणुकीला सामोरे जाणार नाही अशा महापालिका अथवा अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची लढत ही मैत्रीपूर्ण पद्धतीने सत्तेतील मोठा भाऊ असलेल्या बलदंड भाजपा उमेदवारांसोबत होणारच आहे. मात्र त्याचबरोबर उद्धव ठाकरे यांची शिवसेना देखील एकनाथ शिंदे यांच्या शिवसेने समोरचा प्रमुख प्रतिस्पर्धी असणार आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजकीय भवितव्याचा विचार करावयाचा झाला तर त्यांना राज्यातील सत्तेमध्ये त्यांचे असलेले स्थान अबाधित राखण्यासाठी आणि त्याचबरोबर भविष्यामध्ये पुन्हा एकदा महाराष्ट्राचे नेतृत्व करण्याची संधी मिळण्यासाठी कोणत्याही परिस्थितीत मुंबई महापालिका त्याचबरोबर ठाणे जिल्ह्यातील ६ महापालिका, नाशिक महापालिका अशा या किमान महापालिकांवर तरी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा सत्तेचा झेंडा हा त्यांना कोणत्याही परिस्थितीत फडकवावाच लागणार आहे. त्यातही मुंबई महापालिका आणि ठाणे जिल्ह्यातील महापालिका या एकनाथ शिंदे यांच्या स्वतःच्या राजकीय अस्तित्वासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

त्याचप्रमाणे अद्याप तरी महापालिका निवडणुकांसाठी राज ठाकरे यांच्या मनसेची कोणतीही ठोस भूमिका स्पष्ट झालेली नाही. महायुती आणि महाआघाडी या दोन्ही प्रमुख प्रतिस्पर्धी राजकीय आघाड्यांमध्ये पक्षांची जी काही भाऊगर्दी झाली आहे आणि त्यामुळे या सर्वाचा परिणाम स्थानिक पातळीवरील उमेदवार निवडीमध्ये जो होणार आहे ते लक्षात घेता मनसे स्वतंत्रपणे लढते की उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेबरोबर युती करते अथवा दोन्ही शिवसेना तसेच दोन्ही राष्ट्रवादी यांना बाजूला सारून एकट्या भाजपबरोबर हात मिळवणी करते अशा विविध शक्यतांवर स्थानिक यश अपयशाची गणित अवलंबून आहेत. कारण शेवटी ही स्थानिक पातळीवरील निवडणुका आहे दोन पाच मतांनी देखील उमेदवार पडतात जिंकून येतात अशा अत्यंत कमालीच्या अस्थिर परिस्थितीमध्ये राज ठाकरे यांची मनसे जर स्वबळावर निवडणूक लढवण्याच्या निर्णयावर आली तर त्याचा परिणाम हा ज्याप्रमाणे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेवर होऊ शकतो तसाच परिणाम तो एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेवर देखील होऊ शकतो हे लक्षात घेण्याची गरज आहे. त्यामुळे मनसेच्या भूमिकेवरही राजकीय फायदे तोटे अवलंबून आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसाठी मुंबई महापालिका, ठाणे महापालिका, कल्याण डोंबिवली महापालिका, मीरा-भाईंदर महापालिका, उल्हासनगर महापालिका, नाशिक महापालिका, छत्रपती संभाजी नगर महापालिका आणि तसेच काही प्रमाणात पुणे महापालिका अशा महापालिकांमध्ये यश मिळणे हे त्यांच्यासाठी अत्यावश्यक आहे. जर उद्धव ठाकरे यांच्यापेक्षा आपले नेतृत्व अधिक सरस आणि कर्तृत्ववान आहे हे जर का सिद्ध करायचे असेल, तर एकनाथ शिंदे यांना या सर्व महापालिकांमध्ये पुन्हा एकदा शिवसेनेचे महापौर बसवावे लागणार आहेत तरच स्थानिक पातळीवर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे अस्तित्व टिकून राहणार आहे.

अर्थात एकनाथ शिंदे हे देखील काही कच्च्या गुरुचे चेले नाहीत. त्यांनी राज्यामध्ये महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांची तयारी आधीपासूनच सुरू केली आहे. त्यामुळेच उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे तसेच शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, जिल्हाप्रमुख, जिल्हाध्यक्ष तसेच महत्त्वाचे पदाधिकारी आणि हजारो कार्यकर्ते हे त्यांनी निवडणुकीच्या पूर्वीच स्वतःच्या शिवसेनेकडे वळवले आहेत. त्यांचे हे इनकमिंग यापुढेही सुरूच राहणार आहे. स्थानिक निवडणुका जिंकण्याचा जो काही हातखंडा एकनाथ शिंदे यांच्याकडे आहे तेवढे कसब अद्याप तरी अन्य नेत्यांकडे देखील नाही हे देखील लक्षात घेतले पाहिजे. या तुलनेत उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नेते तर एकनाथ शिंदे यांच्यापासून कोसो दूर आहेत. मात्र असे असले तरी देखील राजकारणात पडद्याआडून ज्या काही राजकीय हालचाली होत असतात त्या उलथापालथ करण्यास प्रामुख्याने कारणीभूत ठरतात. आणि एकनाथ शिंदे यांना जो धोका आहे तो इथेच आहे एवढेच त्यांनी लक्षात घेतले पाहिजे.

**- सुनील जावडेकर**

# बेस्टला पुनर्वैभव प्राप्त होण्याचे संकेत

सातत्याने तोट्याचा सामना करावा लागणाऱ्या बेस्टला वाचवण्यासाठी अखेर नारायण राणे यांनाच पुढाकार घ्यावा लागला. हे एक प्रकारे बरेच झाले. नारायण राणे यांनी आतापर्यंत बेस्ट समिती अध्यक्षपद, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री अशी अनेक पदे आतापर्यंत भूषविली आहेत त्यांच्या अनुभवाचा फायदा करून घेण्यासाठीच बेस्टच्या समर्थ कामगार संघटनेचे शिष्ट मंडळ यांनी नारायण राणे यांच्यासोबत बेस्टचे महाव्यवस्थापक यांची महिनाभरापूर्वी भेट घेतली. यात बेस्टच्या अनेक समस्यांवर चर्चा करण्यात आली त्यावर बेस्ट महाव्यवस्थापकांनी सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिले, त्यामुळे बेस्टच्या लाखो कामगारांना तूर्तास दिलासा मिळाला असून लवकरच बेस्ट या आर्थिक संकटातून बाहेर पडेल यावर कर्मचाऱ्यांचा विश्वास आहे.

बेस्टला तोट्यातून बाहेर काढायचे असेल तर काही गोष्ट करणे आवश्यक आहे जसे की ज्या गोष्टींवर कार्यवाही करणे वर्षानुवर्षे शक्य झाले नाही अशा गोष्टी मार्गी लावणे ज्यामुळे बेस्ट तोट्यातून बाहेर येऊ शकेल असे उपाय करणे शक्य आहे. जसा बेस्टचा क अर्थसंकल्प महापालिकेच्या अर्थसंकल्पात विलीन करणे ही गोष्ट बऱ्याच वर्षांपासून प्रलंबित आहे. मुंबई महापालिकेने हा प्रस्ताव संमत करून तो सरकारच्या नगर विकास खात्याकडे पाठवला असल्याचे म्हटले जाते, मात्र तांत्रिकदृष्ट्याही गोष्ट शक्य नसल्याचे पालिका आयुक्त सांगतात. पाहिजे तर हवा तेवढा पैसा घ्या, मात्र एकत्र करण्याच्या वार्ता करू नका, असे पालिका आयुक्तच खासगीत सांगतात कारण तांत्रिकदृष्ट्या ते शक्य नाही. मात्र आता हा विषय बाजूला ठेवून बेस्टला आणखी मदत करता येईल का, तर सध्या तरी पालिका याबाबतीत हतबल झालेले दिसते. या अगोदरच १५००० ते १८००० करोड मुंबई महानगरपालिकेने बेस्टला दिलेली आहेत, मात्र बेस्टमधील वाढीव तोटा पाहता आणखी पैसे देणे शक्य नाही. नुकतीच मुंबई महानगरपालिकेने बेस्टला बस भाडेवाढ करण्याची अनुमती दिली, मात्र ही बस भाडेवाढ पाहता बेस्टला जास्तीत जास्त वर्षाला तीनशे ते साडेतीनशे करोड निधी मिळू शकेल. मात्र त्याच दरम्यान प्रवाशांमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाल्याने बस भाडेवाढ किती प्रमाणात सफल झाली ते येणारा काळच ठरवेल असो ...

दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मान्यताप्राप्त कामगार युनियनने बेस्ट प्रशासनाशी विषय केलेल्या कराराप्रमाणे बेस्टचा स्वमालकीचा बस ताफा हा ३३६७ इतका अबाधित राखणे हा होता. काही वर्षांपूर्वी बेस्टकडे ४५०० स्व




मालकीच्या बस होत्या आज ही संख्या घटून ७००वर आलेली आहे, तर अडीच हजारहून जास्त बस या खाजगी कंत्राटदारांच्या झाल्या आहेत. बेस्टच्या बस चालकांवरती अथवा अन्य कर्मचाऱ्यांच्या नोकरीवर गदा येऊ नये म्हणून कामगार संघटनांनी तत्कालीन पालिका आयुक्तांबरोबर हा करार केला होता त्यात ही अट ठेवली होती. त्यात मुंबई पालिकेने भंगारात जाणाऱ्या बस गाड्यांच्या खरेदीसाठी मुंबई महानगरपालिका अनुदान देईल असे सांगितले होते. बेस्टने या अटींवर खासगीकरणास मान्यता दिली होती. मात्र खाजगी बस गाड्या बेस्ट बसच्या ताफ्यात आल्या. मात्र स्वमालकीच्या बस गाड्या घेण्यास पालिकेने अनुदान न दिल्याने आजपर्यंत स्वमालकीच्या बस गाड्यांची संख्या ८०० वर आली आहे. त्यामुळे त्यावर काम करणारे बस चालक व अभियांत्रिकी कर्मचारी रिक्त झाले आहेत, तर दुसरीकडे अडीच हजार हून जास्त बस गाड्या कंत्राटदारांच्या आल्याने व येणाऱ्या काळातही ५००० हून अधिक बस गाड्या या कंत्राटदाराच्या होणार असल्याने बेस्ट स्वमालकीचा बसगाड्या घेणार नाही हे आता ठळकपणे दिसत आहे.

## मुंबई डॉट कॉम

आणखी एक विषय यावेळी मांडण्यात आला तो म्हणजे कर्मचाऱ्यांना देय असलेला कोविड काळातील कोविड भत्ता प्रदान करणे. यातील खरी गोम म्हणजे राज्य सरकारकडून ७६ कोटींचा कोविड भत्ता बेस्टकडे आलेला आहे. मात्र काही तांत्रिक कारणे पुढे करून बेस्ट अजूनही तो कर्मचाऱ्यांना देण्यास तयार नाही. कोरोना काळ हा सगळ्यांसाठीच खूप वाईट काळ होता इतर सर्व घटकातील कर्मचारी कामगारांनी घरी बसून काम केले, मात्र कोरोना काळात आघाडीवर असलेल्या कर्मचाऱ्यांना बाहेर पडूनच काम करणे भाग होते. त्यात आरोग्य सेविकांप्रमाणेच त्यांना नें आण करण्यासाठी रेल्वे बंद असल्याने बेस्टने महत्त्वाची कामगिरी त्याकाळी बजावली होती. बेस्ट बस सेवा ही कधी नव्हे ती थेट कर्जत कसारा खोपोली विरारपर्यंत धावली होती. त्यात कितीही हाल अपेष्टा सहन करून कर्मचाऱ्यांना काम करावे लागले. संध्याकाळी कर्जत-कसाराला पोहोचलेल्याला रात्रभर बस मध्ये झोपून काढावे लागले. त्यात कोरोनाची भीती होतीच. त्यातही काळजी घेतलेल्यांना ही कोरोना झाला. असंख्य कर्मचाऱ्यांना त्यात आपले प्राण गमवावे लागले. म्हणून राज्य सरकारने भत्ता म्हणून त्याकाळी कोरोना भत्ता दिला होता. मात्र आता तो ही रक्कम इतर ठिकाणी वळवल्याने कोरोना भत्ता कधी मिळणार याकडे साऱ्या कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

**क्रमश :**

**- अल्पेश म्हात्रे**

## राशिभविष्य

**सोमवार, १९ मे २०२५**

### ॥ पंचांग ॥

आज मिती वैशाख कृष्ण षष्ठी ०६.१४ पर्यंत नंतर सप्तमी शके १९४७. चंद्र नक्षत्र श्रवण. योग ब्रह्म, चंद्र राशी मकर, भारतीय सौर २९ वैशाख शके १९४७ म्हणजेच सोमवार दिनांक १९ मे २०२५. मुंबईचा सूर्योदय ०६.०२, मुंबईचा सूर्यास्त ०७.०७, मुंबईचा चंद्रोदय ००.४७ उद्याची मुंबईचा चंद्रास्त ११.२४, राहू काळ ०७.४० ते ०९.१८, धनिष्ठानवकारंभ, सायंकाळी ०७.२९ नंतर

### ॥ भविष्य ॥

**मेष** : महत्त्वाच्या कामांना गती मिळेल.

**वृषभ** : आनंदाचे वातावरण राहणार आहे.

**मिथुन** : मानसिक उत्साह वाढेल.

**कर्क** : कामे मार्गी लागतील.

**सिंह** : हातातील कामे वेगाने पूर्ण कराल.

**कन्या** : कौटुंबिक सुख मिळेल.

**तूळ** : स्पर्धकांवर मात करता येईल.

**वृश्चिक** : नावलौकिक मिळेल.

**धनू** : प्रवासाचे योग आहेत.

**मकर** : प्रयत्न करणे महत्त्वाचे ठरेल.

**कुंभ** : दिवस आनंदात जाईल.

**मीन** : व्यवसायात नवीन बदल करू शकाल.

## जनसंवाद

### डेब्रिज ऑन कॉल सेवा पर्यावरणपूरक

मुंबई महानगरपालिकेने डेब्रिज निर्मूलन करण्यासाठी डेब्रिज ऑन कॉल अशी सेवा सुरू केलेली आहे. डेब्रिज ऑन कॉल ही एक ऑनलाईन प्रणाली मार्फत चालविण्यात येणारा स्वच्छतेचा उपक्रम आहे. मुंबई सारख्या महानगरात सतत नवनवीन बांधकामे आणि घर दुरुस्ती सुरू असतात आणि यातूनच रोज डेब्रिज आणि डेब्रिजची विल्हेवाट किंवा वाहतूक आशा अनेक समस्या निर्माण होत असतात. डेब्रिजचा थेट पर्यावरणाशीच संबंध येत असल्याने महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या जवाबदारीत भर पडत होती. डेब्रिज ही समस्या जशी सामान्य जनतेची आहे तशी मोठ्या प्रमाणात बांधकाम विकासकाची आहे. डेब्रिज ऑन कॉल सेवेला मुंबईकरानी खूप चांगला प्रतिसाद दिलेला आहे. डेब्रिज पाचशे किलोपर्यंतच्या अंतरासाठी संकलन सेवा मोफत ठेवली आहे. यामुळे घरगुती वापरातून तयार झालेले डेब्रिज संकलन करण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे आपोआपच रस्त्यावरील इतरत्र डेब्रिजचे प्रमाण कमी झाले आहे. डेब्रिज अशाप्रकारे संकलन करण्याची पद्धतीला आज जवळजवळ दहा वर्षे पूर्ण झाली आहे. जेमतेम पंचवीस हजार ठिकाणाहून डेब्रिज संकलनाचे काम चालते. टोल फ्री नंबरच्या माध्यमातून बारा तास चालणारी ही सेवा चौवीस तास करण्याचा यंत्रणेचा विचार आहे. डेब्रिजवर प्रक्रिया करण्यावर देखील भर दिली जात आहे. एकंदरीत डेब्रिज ऑन कॉल ही सेवा उत्कृष्ट व पर्यावरणपूरक देखील आहे,असे वाटते.

– **संजय साळगांवकर,** कुर्ला,मुंबई

### महाराष्ट्राच्या सुपुत्राला आव्हान स्वीकारावे लागेल

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी न्यायमूर्ती भूषण गवई यांना सरन्यायाधीशांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. न्यायमूर्ती भूषण गवई यांचा सरन्यायाधीशपदाचा कार्यकाळ आजपासून २३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत म्हणजेच सहा महिने दहा दिवसांचा असणार आहे. त्यांना त्यांच्या लहान कार्यकाळात चांगले निर्णय देऊन सरन्यायाधीशपदाचा सन्मान करता येईल. अनुसुचित जाती वर्गातील दुसरे सरन्यायाधीश देशाला लाभले आहेत, तर गवई हे मुळचे महाराष्ट्रातील अमरावतीचे असल्याने राज्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. न्यायमूर्ती गवई यांनी ऐतिहासिक निर्णयांचा आदर्श देशासमोर ठेवावा. उपराष्ट्रपती जयदीप धनखड यांनी न्यायलयाच्या काही निर्णयावर आक्षेप घेऊन न्यायलय मोठे की संसद मोठी असा वाद घालून संसदची बाजू मांडली होती. न्यायमूर्ती भूषण गवई यांनी चर्चा करून यावर योग्य निर्णय देऊन वाद न घालता देशाचा प्रश्न सोडवावा. न्यायालयाचे महत्त्व कमी न करता व देशात हुकुमशाही न आणता योग्य निर्णय घेण्याचे आव्हान सरन्यायाधीशांना स्वीकारावे लागेल.

– **विवेक तवटे,** कळवा, ठाणे

### माउंट एव्हरेस्ट नव्हे, 'चोमोलुंगमा'!

आपल्या सार्वभौम भारताच्या अरुणाचल प्रदेश राज्यातील अनेक ठिकाणांची नावे बदलण्याचे चीनचे मनसुबे भारताने उधळल्यानंतर चीनची वक्रदृष्टी आता माउंट एव्हरेस्टवर पडली असल्याचे नेपाळमधील एका आंतरराष्ट्रीय कार्यक्रमातून समोर आले आहे. काठमांडू येथे नेपाळ सरकारने आयोजित केलेल्या 'सगरमाथा संवादा'च्या उद्घाटन सत्रात शिओ जी या उच्चस्तरीय चिनी अधिकाऱ्याने आपल्या वीस मिनिटाच्या भाषेत माउंट एव्हरेस्टचा उल्लेख चिनी भाषेत तब्बल दहा वेळा 'चोमोलुंगमा' असा केला. वास्तविक नेपाळचे पंतप्रधान केपी शर्मा ओली यांनी अलीकडेच माउंट एव्हरेस्ट हे शिखर जगभरात 'सगरमाथा' या नेपाळी नावाने ओळखले जावे असे म्हटले होते. त्यामुळे शिओ जीनी केलेल्या माउंट एव्हरेस्टच्या चिनी नामांतरामुळे ओली यांची मोठी कुचंबणा झाली. यावेळी चीन, भारत आणि इतर आशियाई देशांसह जगभरातील ३०० पेक्षा अधिक उच्चस्तरीय प्रतिनिधी उपस्थित होते. माउंट एव्हरेस्ट हे पृथ्वीवरील सर्वोच्च शिखर नेपाळ आणि चीनमधील तिबेटच्या स्वायत्त प्रदेशाच्या सीमेवर असल्यामुळे माउंट एव्हरेस्ट हे शिखर चीनमध्ये असल्याचा दावाही चीनकडून नेहमी केला जातो. माउंट एव्हरेस्टच्या चिनी नामांतरामुळे नेपाळ सरकार आता कोणती भूमिका घेणार याकडे आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष लागून राहिले आहे.


– **प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी (पूर्व), मुंबई

### रो. को. नसल्याची खंत जाणवेल का?

रोहीत आणि विराट यांच्या कसोटी क्रिकेट निवृत्तीनंतर त्यांच्या कारकिर्दीचे तुलनात्मक मोजमाप घेणारे लिखाण अनेक वर्तमानपत्रांत झळकले आहे. सुदैवाने भारताला क्रिकेट अवकाशात कायम लखलखणाऱ्या ताऱ्यांची जोडगोळी सातत्याने लाभली आहे. सुनील-विश्वनाथ ते अगदी आत्ताच्या रोहीत-विराट जमलेल्या दुकलींनी क्रिकेट आसमंत उजळून टाकताना सुनील गावस्कर युग, सचिन तेंडुलकर युग, विराट कोहली युग निर्माण केले. विजिगीषु वृत्तीचे स्फुल्लिंग भारतीय संघात प्रज्वलीत केले ते सौरभ गांगुलीने! लक्ष्मण, सेहवाग, युवराजने बेडरपणा दाखवला. चंद्रा, बेदी, प्रसन्ना, व्यंकट या चौकडीनंतर अष्टपैलू जडेजा, अश्विन या फिरकी जोडीने एकहाती सामने जिंकून देण्याची भूमिका चोख बजावली. या सर्व वैभवशाली वाटचालीत विराटची उपजत आक्रमकता अधिक उजवी ठरली. क्रिकेटशी एकरूप कसे व्हायचे हे सचिनच्या व्यक्तीरेखेच्या निरीक्षणांतून आत्मसात करताना विराटने कमालीच्या अथक परिश्रमाने शारीरिक तंदुरुस्तीविषयी वेगळा आयाम निर्माण केला. तो 'फोकस' आपल्या अंगवळणी पडावा असा प्रयत्न रोहितने केला नाही. त्यामुळे एकेरी धावा घेण्याची चपळाई विराट इतकी रोहितला जमली नाही. कल्पक नेतृत्वाच्या शर्यतीत रोहीत प्रगल्भ ठरला असला तरी कर्णधार म्हणून विराटनेच जास्त कसोटी जिंकल्या. २०२३ पासून दोघांची एकाग्रता ढळू लागली. उजव्या यष्टीबाहेरचे चेंडू विराटचा घात करू लागले तर रोहितच्या यष्ट्या उध्वस्त होऊ लागल्या. नवीन प्रशिक्षक, निवड समितीचे नवीन धोरण स्वीकारणे न जमल्याने दोघांनी कसोटीतून घेतलेल्या निवृत्तीचे जे प्रतिबिंब आगामी इंग्लंड दौऱ्यात पडेल. त्यात रो. को. संघात नसल्याची खंत जाणवेल का?

– **हेमंतकुमार मेस्त्री,** मनोर.

# 'ठहरिये होश में आलूँ तो चले जाइयेगा'



राजेंद्रकुमार आणि साधनाचा 'आरजू'(१९६५) म्हणजे संगीताची मेजवानीच होती. सिद्धहस्त गीतकार हसरत जयपुरी, सुपरस्टार संगीतकार शंकर-जयकिशन, लतादीदी, आशाताई, रफीसाहेब, शमशाद बेगम या अतिशय प्रतिष्ठित कलाकारांनी १९६५ मध्ये ही मैफल सजवली होती. तिची मजा, तिचा खुमार युट्यूबमुळे आजही घेता येतो हे तसे केवढे सुदैव!

आरजूची कथा एका गैरसमजावरची आणि निरागस प्रेमाच्या शक्तीची कथा होती. उषाला (साधना) अपंगत्वाबद्दल तिरस्कार आहे. 'अपंगाचे जीवन जगण्यापेक्षा मरून जाणे बरे' असे ती एकदा सरजूशी (राजेंद्रकुमार) बोलताना म्हणते. पुढे राजेंद्रकुमारला अपघात होऊन त्याचा एक पाय जातो. त्यामुळे तो स्वतःहूनच तिला काही न सांगता तिच्या आयुष्यातून निघून जातो. त्यानंतर अनेक घटना घडून शेवटी त्याला उषाच्या अढळ प्रेमाची खात्री पटते आणि सिनेमा सुखांत होऊन जातो.

'आरजू'चे कलाकार होते राजेंद्रकुमार (सरजू), साधना (उषा कपूर), फिरोझ खान (रमेश), मेहमूद अली, नाझीर हुसैन (दिवान किशन किशोर), इंग्रजी सिनेमातही चमकलेला मराठी अभिनेता नाना पळशीकर (डॉक्टर), धुमाळ (मुन्शी) आणि नझीमा (सरला). लेखक, निर्माते, दिग्दर्शक रामानंद सागर यांनी 'आरजू' बेतला होता 'ॲन अफेयर टू रिमेम्बर'वर. सिनेमाला विविध पुरस्कारांसाठी ५ नामांकनेही मिळाली. मात्र तो रसिकांच्या लक्षात आहे त्याच्या कर्णमधुर गाण्यांसाठी! ते श्रेय सुपरस्टार-संगीतकार शंकर-जयकिशन यांचेच.

आरजूच्या गाण्यांच्या नुसत्या पहिल्या ओळी ऐकल्या तरी हुरहूर वाटत राहते की गेल्या काही दशकात आपण किती अनमोल गोष्टी कायमच्या गमावल्या! कारण आता पुन्हा अशी गाणी लिहिली जाणार नाहीत आणि असे शंकर-जयकिशन होणार नाहीत!

आरजूमध्ये एक कव्वाली होती –

**" जब इश्क कही हो जाता हैं, तब ऐसी हालत होती हैं,**
**महफिलमे जी घबराता हैं, तनहाईकी आदत होती हैं."**

प्रेमात पडलेल्या व्यक्तीच्या आगळ्याच मनःस्थितीचे किती सुंदर वर्णन! प्रेमिकेला मित्र-मैत्रिणीपासून दूर जाऊन मनातल्या मनात 'त्याच्या'सहवासाची गोड कल्पनाचित्रे काढणे, दिवास्वप्ने रंगवणे कसे आवडू लागते ते गीतकारांनी नेमके मांडले होते. मुबारक बेगम आणि आशा भोसलेंच्या आवाजातल्या या गाण्यात संगीतकारांनी एक धाडसी प्रयोग केला. धृवपद पारंपरिक कव्वालीच्या शैलीत आणि मधले संगीत चक्क जाझसारखे पाश्चिमात्य! असेच दुसरे गाणे होते -

**"बेदर्दी बालमा तुझको मेरा मन याद करता हैं,**
**बरसता हैं जो आंखो से वो सावन याद करता हैं."** अपंगत्वामुळे राजेंद्रकुमार साधनाच्या जीवनातून गुपचूप निघून गेला आहे. साधनाला त्याला शोधणे अशक्य झाले आहे आणि ती त्याच्या आठवणीत झुरते आहे. अवघ्या दोन ओळींत सगळे बसवले हसरत साहेबांनी! या गाण्याने अस्वस्थ झाला नाही असा रसिक मिळणार नाही.

असेच दुसरे एक गाणे प्रेमातील प्रारंभिक प्रियाराधनाचे सर्वोत्तम उदाहरण म्हणावे लागेल -

**"ए फुलों की रानी, बहारों की मलिका,**
**तेरा मुस्कुराना गजब हो गया."**

रफीसाहेबांनी गायलेले हे गाणे प्रेमातूर तरुणात पिढ्यानपिढ्या लोकप्रिय राहिले! असेच प्रेयसीच्या सौंदर्याने घायाळ झालेल्या प्रियकराची मानसिकता प्रकट करणारे गाणे होते-

**"छलके तेरी आंखो से शराब और जियादा,**
**खिलते रहे होठों के गुलाब और जियादा!"**



जणू तिच्या नयनातून मदिरा ओघळते आणि ती प्रियकराला बेधुंद करून टाकते. तिचे ओठही गुलाबाच्या कळ्यांसारखे हळूहळू उमलताहेत आणि हा म्हणतो, 'ते अजून विलग होऊन त्यातून प्रेमाचे चार मधुर शब्द बाहेर येऊ देत.' 'आरजू'मधली सर्वच गाणी अशी रोमँटिक, सघन आणि कर्णमधुर होती.



नॉस्टॅल्जिया

श्रीनिवास बेलसरे

राजेंद्रकुमार आणि साधनामध्ये सुरुवातीची नोकझोक सुरू आहे. काश्मीरच्या एका नयनरम्य दरीत साधना घोड्यावरून चालली आहे. राजेंद्रकुमार तिला वश करण्याचा प्रयत्न करतो आहे असा प्रसंग होता. आमच्या हसरत साहेबांचे गाणे लगेच तयार -

**'ए नर्गीसे मस्ताना, बस इतनी शिकायत हैं,**
**समझा हमे बेगाना, बस इतनी शिकायत हैं.'**

दुसऱ्या एका गाण्यात ती रुसलेल्या राजेंद्रकुमारला मनवते असा प्रसंग होता. उत्कट प्रेम, स्वतःच्या प्रेमावरचा दृढ विश्वास, जिवलगाचे मन जिंकण्यासाठी काहीही करण्याची तयारी या सगळ्याचे सुंदर मिश्रण म्हणजे हे गोड प्रेमगीत!

साधना म्हणतीये, 'प्रिया, तू माझ्यावर रुसून जाशील तरी कुठे? आणि जिथे कुठे जाशील तिथे तर मी असणारच आहे'.

**'अजी रूठकर अब कहाँ जाईयेगा,**
**जहाँ जाईयेगा, हमें पाईयेगा.'**

प्रिया, तू माझ्या नजरेआड जाऊच शकणार नाहीस. कारण माझे सगळे लक्ष फक्त तुझ्याकडेच आहे! आणि दूर गेलास तरी माझ्या हृदयातून कसा जाशील? तिथून जाऊन दाखव! कुठेही लपलास तरी माझ्या नजरेत असणारच आहेस.

**'निगाहोंसे छुपकर दिखाओ तो जाने,**
**खयालों में भी तुम ना आओ तो जाने,**
**अजी लाख परदों में छुप जाईयेगा,**
**नजर आईयेगा, नजर आईयेगा.'**

हे गाणे ती पार्टीत गात असल्यामुळे तिला इतरांचा विचार करणे भाग आहे. सगळेच काही व्यक्त करता येत नाही. म्हणून ती त्याला विनवते, 'मला सगळेच बोलायला लावू नकोस. काही गोष्टी तुझ्या तूच समजून घे ना. माझ्या डोळ्यांत बघ. माझ्या नजरेतून त्या तुला दिसतील. थोडे समजावून घेऊन त्यांच्याकडे जरा लक्ष देशील? या कडव्यातली 'समझकर जरा गौर फरमाईयेगा' ही लाडिक अजिजी मोठी गोड आहे.

**'जो दिल में हैं होठों पे लाना भी मुश्किल,**
**मगर उसको दिल में छुपाना भी मुश्किल,**
**नजरकी जुबांसे समझ जाईयेगा,**
**समझकर जरा गौर फरमाईयेगा.'**

माझी मनःस्थिती जरा लक्षात घेशील? तुझ्या प्रेमाने मला जणू संमोहित करून टाकले आहे. त्या जादूचा केवढा अंमल आहे माझ्यावर! मन अगदी थाऱ्यावर नाही रे! नजर भिरभिरते आहे. मला जरा सावरू तर दे, मग जायचेच असले तर जा. पण नको, नको! थांब की रे! जिवलगा, असा रुसून जाशील तरी कुठे?

**'ये कैसा नशा हैं, ये कैसा असर हैं,**
**ना काबू में दिल हैं, ना बस में नजर हैं.**
**जरा होश आ ले, चले जाईयेगा,**
**ठहर जाईयेगा, ठहर जाईयेगा.**
**अजी रूठकर अब कहाँ जाईयेगा...'**

जुन्या काळातली शांत सुस्थीर जीवनशैली, त्यातून निर्माण झालेल्या रसरशीत कलाकृती, त्यात मानवी भावनांचे केलेले प्रांजळ मनोज्ञ चित्रण अनुभवणे हा एक वेगळाच आनंद असतो. पण त्यासाठी मागे जाणेच श्रेयस्कर, नाही?

# 'हा वारसा देऊ शकता तुमच्या मुलांना'



वारसा'(Inheritance) हा शब्द आपल्या कुटुंबातील मूळ आणि मुल्यांची आठवण आपल्याला करून देतो. प्रत्येक घर मुलाला काही देत असतं. मुलांना आपलं कूळ आणि मूळ माहीत असणं खूप आवश्यक असतं कारण समाजात वावरण्याच्या जाणिवा, नियम, संकेत मुलांना त्यातून कळतात. 'वारसा'देखील तसाच. तो फक्त घर, संपत्ती, दागदागिने, नाव, प्रतिष्ठा यांचाच नसतो कारण तो तर पालकांनी किंवा मुलांनाही काही न करता सहज मिळतो. मात्र सद्गुणांचा, सदवर्तनाचा वारसा मुलांमध्ये रुजवणं ही खूप महत्त्वाची बाब आहे. घराने मुलाला द्यायचा असतो देशप्रेमाचा, समाजसेवेचा, कलेचा, माणुसकीचा, दानशूरपणाचा वारसा. वारसा असाही असतो जो भविष्यकाळात मुलांना एक संवेदनशील, बुद्धिमान आणि उदारमतवादी नागरिक बनवतो.

पालकांनो वारसा देऊ या आणि मुलांचं व्यक्तिमत्त्व अधिक प्रगल्भ बनवण्यासाठी काय करता येईल ते पाहू या.

**१. शहाणपण (Wisdom)**

मुलाचं शहाणपण हे शाळेत मिळालेल्या मार्कांवरून ठरत नाही. शहाणपण जीवन जगण्यातून येत असतं. मुलांना शाळेतून नाही तर आई-वडिलांच्या शिकवण्यातून शहाणपण येत असतं. पालक हे शहाणपण शिकवण्यासाठी सगळ्यात उत्तम व्यक्ती असतात. तुमच्या मुलांचे मार्गदर्शक बना. तुमचे अनुभव त्यांच्याबरोबर शेअर करा. आयुष्याचे कठीण धडे शिकताना ट्रायल अँन्ड एरर पद्धतीने मुलांनी शिकणं हे जोखमीचं आहे. अशावेळी तुम्ही त्यांच्या बरोबर असलात तर सजगपणे, शहाणपणाने कसं वागावं आणि तुमच्यापेक्षा त्यांनी अधिक प्रगती कशी करावी याचा वस्तूपाठ तुम्ही मुलांना देऊ शकाल.

**२. सामाजिक कौशल्य**

आयुष्य हे नातेसंबंधाच्या रेशीमधाग्यांनी विणलेल्या वस्त्रासारखं गुंतागुंतीचं असतं. ही नाती निर्माण करणं, जपणं, कायम करणं यासाठी सामाजिक कौशल्यं आवश्यक असतात. हा वारसा आपण मुलांना देऊ या.

स्वतःला कसं सांभाळायचं ते मुलांना शिकवा. भाऊ, बहीण हे नातं कसं फुलवायचं, भिन्नलिंगी लोकांना कसं हॅन्डल करायचं. योग्य संगत कशी निवडायची ? मित्र कसे बनवायचे, मैत्री कशी टिकवायची ? लोकांशी इंटरॲक्ट कसं करायचं? समाजात कसं जुळवून घ्यायचं, संवाद कसा करायचा ही सोशल स्किल्स शिकण्याची संधी दिली, तर मोठेपणी मुलांना त्याचा खूप फायदा होईल.

**३. कुटुंबाचा निरोगी दृष्टिकोन**

मुलांसमोर तुम्ही नवरा-बायको म्हणून नातं कसं असावं याचं उदाहरण घालून द्या. तुमचं वैवाहिक जीवन, प्रेम, ओढ, आदर, समजूतदारपणाचं असेल तर मुलं त्यांच्या पुढच्या आयुष्यात त्यांच्या जोडीदाराशी खूप छान नातं फुलवू शकतील. एकमेकांविषयी आदराने बोललात, तर लग्नाच्या नात्यात जोडीदाराचं अस्तित्व खूप महत्त्वाचं असतं हेही मुलांना कळेल.

**४. मधुर, गोड, छान आठवणी**

लहानपणाच्या आठवणी मोठं झाल्यावरही आपल्याला खूप आनंद देतात. मुलांनाही त्यांच्या लहानपणाच्या आठवणी जतन करायला शिकवा. आपण असू किंवा नसू पण आपण अस्तित्वात नसलो तरी त्या आठवणींचा वारसा त्यांच्या सोबत असेल. मुलांना वाटेल की माझ्या पालकांच्या रूपाने या जगात चांगली माणसं आहेत.



आनंदी पालकत्व

डॉ. स्वाती गानू

**५. उत्तम मानसिक आरोग्य**

मुलांसाठी जर आपण दुष्ट आठवणी (trauma) वारसा म्हणून ठेवत असू, तर त्यासारखी दुसरी वाईट गोष्ट नाही . काही मुलांबाबत अशा काही गोष्टी घडलेल्या असतात जसं की काही पालक मुलांचा अपमान करतात. मुलांचं शोषण करतात. त्यांच्याकडे दुर्लक्ष करतात. सतत मुलांची दुसऱ्यांशी तुलना करतात. त्यांना नाकारतात अशा आठवणी मुलांचं मानसिक आरोग्य बिघडवतात. एक सुजाण पालक म्हणून तुम्ही मुलांना उत्तम मानसिक आरोग्याचा वारसा देऊ शकता. त्यासाठी मुलांची काळजी घ्या, त्यांच्यावर प्रेम करा. त्यांना कुशीत घेऊन ते तुमच्याजवळ सुरक्षित आहेत असं त्यांना वाटू दे.

**६. नावलौकिक**

आपला समाजात असलेला नावलौकिक असा असायला हवा पालकांनो की मुलांना तुमच्या नावाचा, कुळाचा, शिक्षणाचा, प्रतिष्ठेचा, मानमरातब या सगळ्या गोष्टींचा सार्थ अभिमान वाटला पाहिजे. आपलं नाव या कुटुंबाशी जोडलं गेलं आहे याचं मुलांना समाधान वाटलं पाहिजे. आनंद झाला पाहिजे.

**७. स्व-ओळख**

तुम्हीच तुमच्या मुलांच्या स्वअस्तित्वाची, स्व-ओळख मिळवण्याची गुरुकिल्ली आहात. तुम्ही त्यांना आपल्या कुटुंबाचा वंशवृक्ष (Family tree) च्या माध्यमातून हे शिकवू शकता. त्यांचे पणजोबा, पणजी, आजोबा, आजी कोण होते? काय करत होते? त्यांचे काका, काकू, मामा, मावशी, चुलत, मावस, मामे भावंडं कोण आहेत? ते काय काम करतात हे मुलांना सांगायला हवं. तुम्ही नातेवाईकांशी कसे वागता? त्यांना कसे भेटता त्यावर मुलं पुढे ही नाती कंटिन्यू करतील हे ठरतं.

**८. आर्थिक संपत्ती**

आई-वडील आपल्या मुलांकरिता जमेल तशी आर्थिक संपत्ती, शेअर्स, गुंतवणूक, घर, जमीन, दागिने या सारख्या स्वरूपात मागे ठेवण्याचा प्रयत्न करतात. जेणेकरून त्यांना या गोष्टींचा पुढील आयुष्यात उपयोग होईल. त्यापेक्षाही जास्त महत्त्वाचे आपण त्यांना संपत्तीचे व्यवस्थापन आणि जतन कसे करावे हेही शिकवायला हवे.

**९. विश्वासाचा वारसा**

देव, प्रार्थना, पूजा, संस्कार, संस्कृती, मूल्ये या गोष्टींच्या ज्ञानाचा वारसाही आपण मुलांना द्यायला हवा. आपण जेव्हा त्यांच्याजवळ नसू तेव्हा हा अध्यात्मिक वारसा त्यांना धीर देईल. मार्ग काढायला मदत करेल. त्यातूनच मुलांमध्ये एकात्मता, कठोर परिश्रम, प्रामाणिकपणा हे गुण अंगी येतील.

# घाव सोसावेच लागतात...

फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे ही. एका गावात एक तरुण मूर्तिकार राहत होता. दगड तासून कोरून सुंदर सुंदर मूर्त्या बनवायचा आणि विकायचा. अशा मूर्त्या बनवण्यासाठी योग्य प्रकारच्या दगडाच्या तो नेहमी शोधात असायचा. एकदा कुठंतरी प्रवास करीत असता त्याला रस्त्याच्या कडेला पडलेले दोन भलेमोठे दगड दिसले. त्याने ते दोन्ही दगड गाडीत घालून घरी आणले. धूऊन घासून पुसून स्वच्छ केले आणि एक दगड घेऊन त्यावर छिन्नी टेकवली आणि हातोड्याने हळूहळू घाव घालायला सुरुवात केली. दोन-चार घाव घातले न घातले तोच त्या दगडातून आवाज आला, 'थांब... खूप दुखतंय. खूप वेदना होताहेत.'

घाव घालणारे मूर्तिकाराचे हात थबकले. 'अरे पण घाव घातल्याशिवाय तुझ्यातून मूर्ती कशी बनवणार मी?' मूर्तिकाराने दगडाला विचारलं.

'नको बनवूस. मला नाही मूर्ती बनायचं. तू माझ्यावर घाव घालू नकोस. मला सहन होत नाहीये. मी आहे तसा ठीक आहे.' दगडाने स्पष्टपणे मूर्तिकाराला आदेश दिला.

'ठीक आहे.' मूर्तिकाराने तो दगड बाजूला ठेवला आणि दुसरा दगड उचलला. त्यावर काम करायला सुरुवात केली.'

'आई गं...' त्या दगडातूनही आवाज आला.

'फार दुखतंय का रे?' मूर्तिकाराने विचारले.

'दुखतंय खरं. पण तू तुझं काम थांबवू नकोस.' दगडाने परवानगी दिली. मूर्तिकार आनंदला. एका वेगळ्याच उत्साहाने कामाला लागला. एका वेगळ्याच तंद्रीत त्याने गुणगुणायला सुरुवात केली.

'भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती वनारी अंजनी सूता रामदूता प्रभंजना...'

मूर्तिकाराच्या मनातील अंतःचक्षूंसमोर मारुतीरायांची मूर्ती उभी राहिली होती आणि हातातल्या छिन्नी हातोड्यांनी दगड कोरला जात होता.

आठ-दहा दिवस अक्षरशः तहान भूक विसरून तो मूर्तिकार दगड कोरत होता. दगडावर छिन्नी हातोड्याने घाव घालत होता. एक एक कपची उडवत होता. त्यावेळी दगड देखील वेदनेने विव्हळत होता. ते घाव सहन करत होता आणि... आणि हळूहळू त्या दगडातून एक मूर्ती स्पष्टपणे आकाराला येऊ लागली. साधीसूधी मूर्ती नव्हे, तर पंचमुखी हनुमानाची मूर्ती. पुढची बाजू पूर्ण झाल्यानंतर मूर्तिकार दगडाच्या मागच्या बाजूला वळला. छिन्नी हातोड्यानं पाठीमागचा भाग कोरायला सुरुवात केली आणि... ती मूर्ती संपूर्ण आकाराला आली. दगडातून साक्षात पंचमुखी हनुमंत प्रकट झाला.

मूर्तिकार शांत झाला. आपल्याच हातून घडलेल्या कलाकृतीकडे अचंब्यानं पाहू लागला. डोळ्यांतून आनंदाश्रू वाहत होते. सजीव वाटावी एवढी जीवंत मूर्ती त्या मूर्तिकाराच्या हातून घडली होती.

त्याच दिवशी संध्याकाळी कुणी एक श्रीमंत माणूस त्या मूर्तीकाराकडे आला. त्याने ती मूर्ती पाहिली आणि तो त्या मूर्तीच्या प्रेमातच पडला.

मूर्तिकाराला त्या मूर्तीची किंमत विचारली. मूर्तिकाराने सांगितलेली किंमत घासाघीस न करता देऊन मूर्ती विकत घेतली. मूर्ती गाडीत घालून नेताना सावकाराची नजर त्या दुसऱ्या दगडावर गेली. त्याने मूर्तिकाराला विचारलं. 'या दगडाचं काय करणार आहेस?'



संवाद

गुरुनाथ तेंडुलकर

'काही नाही. तो असाच पडून राहणार आहे. त्यातून मूर्ती बनवता येणार नाही.'

'ओह. मग मी तो घेऊन जातो.'

'खुश्शाल न्या. पण त्या दगडाचं तुम्ही काय करणार आहात?' मूर्तिकारानं आश्चर्यानं विचारलं.

'आम्ही मुळचे राजस्थानचे. आमच्या घराण्यात हनुमंताची उपासनेची परंपरा आहे. आमच्या गावी अशीच मूर्ती आहे. इथे पुण्याजवळ मी एक कारखाना उभारतोय. कारखान्याजवळ एक हनुमंताचं मंदिर बांधायची माझी इच्छा आहे. त्यासाठी मी ही मूर्ती नेतोय आणि हनुमंताच्या मूर्तीसमोर लोक नारळ फोडतात. हा दुसरा दगड त्यासाठी उपयोगी पडेल की.' सावकार हसत हसत म्हणाला.

या घटनेला अनेक वर्षे लोटली. पंचमुखी हनुमानाची ती मूर्ती आजही मोठ्या दिमाखाने मंदिरात विराजमान आहे. एक जागृत देवस्थान म्हणून दररोज हजारो लोक दर्शनाला येतात. मंगळवार आणि शनिवारी तर भाविकांची मोठीच गर्दी उसळते. त्या मूर्तीची दररोज पूजा केली जाते. तिला नैवेद्य दाखवून प्रसाद वाटला जातो. 'जय हनुमान ग्यान गुण सागर जय कपिंस तिहू लोक उजागर' असे म्हणून हनुमान चालिसाचा पाठ वाचला जातो. नगारा घंटेच्या नादात आरती केली जाते. मूर्तीच्या गळ्यात फुलांचे हार घातले जातात.



'बजरंग बली की... जय' असा जयघोष केला जातो.

आणि... भाविकांनी आणलेले नारळ मूर्तीसमोर ठेवलेल्या 'त्या' दगडावर आपटून फोडले जातात. दर पाच दहा मिनिटांनी फटाका फुटावा तसा आवाज येतो आणि नवीन नारळ दगडावर आदळतो.

अनेक वर्षांपूर्वी मूर्तिकाराकडून छिन्नी हातोड्याचे घाव नाकारणारा दगड आज वर्षानुवर्षं फुटणाऱ्या नारळाचे घाव सहन करतोय. प्रत्येकवेळी फुटलेल्या नारळाच्या पाण्यासोबत त्या दगडाच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू कुणालाच दिसत नाहीत. आपल्या नशिबाला बोल लावत तो दगड त्या मूर्तीसमोर पडून राहिलाय.

जरा आपल्या आजूबाजूला नजर टाकून आपण पाहिलं, तर योग्य वेळी योग्य वयात छिन्नी हातोड्याचे घाव सोसून मूर्ती बनलेले काही लोक आपल्याला आढळतील. अपार कष्ट उपसून, दिवसरात्र मेहनत करून यशाच्या शिखरावर विराजमान झालेल्या व्यक्तींची नावं डोळ्यांसमोर आणा.

गाणं शिकण्यासाठी वाटेल ते श्रम करणारे पंडीत भीमसेन जोशी, पंडित जसराज, गानतपस्विनी किशोरी आमोणकर त्याचबरोबर अगदी अलीकडच्या काळातले प्रथमेश लघाटे, मुग्धा वैशंपायन, कार्तिकी गायकवाड, रोहित राऊत आणि आर्या आंबेकर यांसारखे कलाकार क्रिकेट हा एकमेव श्वास आणि ध्यास मानून दररोज मैदानावर सराव करणारे सचिन तेंडुलकर, विराट कोहली, विरेंद्र सहेवाग, महिंद्रसिंग धोनी...

सिनेमा जगात आपला खास ठसा उमटवणारे अमिताभ बच्चन, अक्षय कुमार, आमिर खान, नवाजुद्दीन सिद्दिकी, मनोज बाजपेयी, नाना पाटेकर, परेश रावल यांच्यासारखे चतुरस्त्र अभिनेते. ज्यांनी छिन्नी हातोड्यांचे घाव सहन करून आयुष्याची मूर्ती बनवली अशी अनेक नावे सांगता येतील. आपण त्यांना डोक्यावर घेतो. त्यांचे कौतुक करतो. गुणगान करतो. पण त्याच बरोबर छिन्नी हातोड्याला घाबरून आयुष्यभर दगडच राहिलेले आणि पुढे केवळ नशिबाला बोल लावून मूकपणे रडणारे जिवंत दगडही आपल्याला दिसतील. किंबहुना अशा दगडांची संख्या खूपच मोठी असल्याचं आढळेल. आयुष्यात विशेष काही करण्यास असमर्थ ठरलेले हे दगड आपल्या प्रतिकूल परिस्थितीला आणि नशिबाला बोल लावतात. पण खरा प्रकार मात्र वेगळाच असतो.

त्यांची मूर्ती बनली नाही कारण मूर्ती बनण्याची क्षमता असूनही योग्य वेळी, योग्य वयामध्ये त्यांनी घाव सहन करायला नकार दिलेला असतो.

काहितरी भव्य मिळवण्यासाठी अनेक दिव्यांतून जावे लागते. झळाळण्यापूर्वी सोन्याला मुशीतून तापवले जाते. लखलखण्यापूर्वी हिऱ्याला पैलू पाडले जातात. वृक्ष होण्यासाठी बीजाला दगड धोंड्यांतून प्रवास करावा लागतो. ऊन-वारा पाऊस यांचा मारा सहन करावा लागतो. गुरुत्वाकर्षणाच्या कक्षेबाहेर उड्डाण करण्यासाठी रॉकेटला खालच्या बाजूला आग लावून घ्यावी लागते. उसातून मधुर रस निर्माण होण्यासाठी त्याला चरकातून पिळून निघावे लागते.

काहीतरी चांगले घडण्यासाठी श्रम करावेच लागतात, घाव सोसावेच लागतात. मेहनत करावीच लागते.

हा जगाचा नियमच आहे.

आपल्या आजूबाजूच्या लोकांकडे जरा पाहा. तुम्हाला अनेकजण असे आढळतील की ज्यांच्या दिवसाचा बराचसा वेळ काही खास काम न करता केवळ निष्क्रियतेत व्यतित होतो.

त्यांना कोणताही अभ्यास करायचा कंटाळा येतो... एखादी कला शिकायचा कंटाळा येतो... एखाद्या खेळामध्ये प्राविण्य मिळवायचा कंटाळा येतो. वाचायचा कंटाळा येतो, लिहायचा कंटाळा येतो, कष्ट करायचा कंटाळा येतो असा प्रत्येक चांगल्या गोष्टींचा कंटाळा करणाऱ्या तरुण तरुणींना व्हॉटसॲपवर टाईमपास करायचा मात्र कंटाळा येत नाही. त्यांना इन्स्टाग्रामवर चॅटिंग करायचा मात्र कंटाळा येत नाही. सेल्फी काढून फेसबुकवर लाईक मिळवायचा मात्र कंटाळा येत नाही. नेटवर सर्फिंग करायचा कंटाळा येत नाही. यू ट्युबवर अनावश्यक व्हीडिओ पाहण्याचा कंटाळा येत नाही. टीव्हीवरच्या रटाळ सिरिअल बघण्याचा कंटाळा येत नाही. एकाच जागेवर काहीही न करता तासनतास बसून मोबाइलवर गप्पा मारण्याचा कंटाळा येत नाही. बसल्या जागी पेंगण्याचा कंटाळा येत नाही.

कंटाळा येतो फक्त अभ्यासाचा, कामाचा, मेहनतीचा...

अशी अनेक माणसं आपल्या आजूबाजूला आढळतील. अंगात रग असेपर्यंत आणि परिस्थितीचे चटके जाणवेपर्यंत त्यांना आपण कुठं चुकतोय याची जाणीव देखील होत नाही. पण... विद्यार्थीदशेत किंवा तरुण वयामध्ये योग्य ते कष्ट न करता दिवस दिवस आळस घालवणाऱ्या अनेकांचे पुढे केवळ दगडच राहतात. शिकण्याच्या वयामध्ये मातापित्यांनी, शिक्षकांनी, थोरामोठ्यांनी सांगितलेले हिताचे बोल म्हणजे छिन्नी हातोड्यांचे घाव असतात. हे घाव नाकारणाऱ्या दगडांना पुढे आयुष्यभर परिस्थितीच्या नारळांचे घाव सोसावेच लागतात.

# मातृ-पितृ भक्त परशुराम

पुराणानुसार श्री विष्णूंचा सहावा अवतार असलेले व जन्माने ब्राह्मण; परंतु वृत्तीने क्षत्रिय असलेले परशुराम हे सात चिरंजीवांपैकी एक आहेत. चारही युगात अस्तित्व असलेले परशुराम हे कलीयुगातील कल्की या अवताराचे गुरू असतील असे मानले जाते.

एकदा भृगूपुत्र ऋचिकाकडे त्याची पत्नी सत्यवती व सासू दोघींनीही पुत्रप्राप्तीसाठी प्रार्थना केली. ऋचिकांनी यज्ञातून उत्पन्न केलेल्या खीरीचे दोन भाग केले, ते वेगवेगळ्या मंत्राने शिजवले व सासू व पत्नीला दिले. ऋचिकने पत्नीसाठी विशेष श्रेष्ठ खीर मंत्रावली असेल असे वाटून सत्यवतीच्या आईने आपला भाग सत्यवतीला व सत्यवतीचा भाग आपण घेतला. हे ऋचिकाला कळल्यावर आता यामुळे फार अनर्थ होईल असे सत्यवतीला सांगितले. तुला होणारा पुत्र विरवृत्तीचा होईल, तर तुझ्या आईला होणारा पुत्र तपी ज्ञानी ब्रह्मवेत्ता होईल असे सांगितले. यावर सत्यवतीने क्षमा मागून पूत्राऐवजी नातवात वीरवृत्ती असावी अशी विनंती केली. तेव्हा ऋचिकाने तसा आशीर्वाद दिला.



पुढे सत्यवतीला जमदग्नी व तिच्या आईच्या पोटी विश्वामित्र जन्मले. जमदग्नीचा विवाह रेणू नावाच्या राजाच्या रेणुका नामक कन्येशी झाला. त्यांना रुक्मवान, सुषेण, वसू, विश्वावसू व राम असे पाच पुत्र होते. पैकी रामाचा जन्म अक्षय्य तृतीयेला झाला. रामाने शिवापासून विद्या ग्रहण केली. शिवाने त्यांना परशू दिला म्हणून ते परशुराम नावाने ओळखले जाऊ लागले. हैहयवंशात त्यावेळी कार्तवीर्य नावाचा राजा होता. त्याने दत्ताची उपासना केली व एक हजार बाहू व कोणापासूनही पराजित न होण्याचा वर मागितला. त्यामुळे तो सहस्त्रबाहू म्हणूनही ओळखला जाऊ लागला.

एकदा तो वनात शिकारीला गेला असता जमदग्नी ऋषींच्या आश्रमात गेला. जमदग्नी ऋषींनी त्याचे एखाद्या राजाच्या थाटात आदर सत्कार करून भोजन व्यवस्था केली. एवढ्या कमी वेळात आपण ही व्यवस्था कशी केली, असे सहस्त्रबाहुने विचारले असता त्यांने आपल्याकडे कामधेनूची मुलगी सुरभी नावाची गाय असल्याने तिच्यापासून सगळी व्यवस्था होते. हे सांगितले तेव्हा सहस्त्रबाहूनी ती गाय आपणास देण्यास सांगितले, पण जमदग्नींनी नकार देताच जबरदस्तीने त्यांनी ती गाय महिश्मतीला नेली. परशुरामाला हे कळतात तो परशु घेऊन महिश्मतीला गेला व त्यांनी प्रथम सहस्त्रबाजूचे हात तोडून नंतर शीर धडावेगळे केले. तेव्हा सहस्त्रबाहूची हजार मुले पळून गेली. परशुरामाने गाय आश्रमात परत आणली.

एकदा जमदग्नी होम हवन करण्यास बसले, असतांना त्यांनी रेणूकेला नदीवरून पाणी आणण्यास सांगितले. ती नदीवर पाणी आणण्यास गेली असता त्या ठिकाणी चित्ररथ नावाचा गंधर्व अप्सरांसोबत जल क्रीडा करत होता. ते पाहण्यात ती गुंग झाल्याने तिला उशीर झाला. तिच्या उशिराचे कारण म्हणजे तिच्यात निर्माण झालेला मानसिक व्यभिचार होता, हे जमदग्नीला कळताच त्यांनी आपल्या चारही मुलांना तिचा शिरच्छेद करण्यास सांगितले. मात्र त्यापैकी कोणीही हे कृत्य करण्यास धजावले नाही. तेव्हा त्यांनी परशुरामाला रेणुकेचे शीर उडवण्यास व बंधूंनाही ठार मारण्यास सांगितले, परशुरामाने पित्याच्या आज्ञेचे पालन केले. त्यामुळे जमदग्नी प्रसन्न झाले, व त्याला वर मागण्यास सांगितले. तेव्हा परशुरामाने प्रथम मातेला व भावांना जिवंत करा आणि त्यांना मी ठार केले या घटनेबद्दल कोणतीही जाणीव असू नये असा वर मागीतला. थोड्याच वेळात ते सर्वजण झोपेतून उठल्याप्रमाणे जागे झाले.

महाभारतातील मोतीकण

भालचंद्र ठोंबरे

परशुरामाने आपल्या पित्याचा वध केल्यामुळे कार्तविर्यार्जूनाची हजार मुले चिडून होती. एकदा परशुराम आश्रमात नसल्याचे पाहून ती हजार मुले जमदग्नीच्या आश्रमात गेली व त्यांनी जमदग्नीची हत्या करून त्यांचे शीर कापून स्वतःसोबत घेवून गेले. हे पाहून रेणुका धाय मोकलून रडू लागली. तिचा आक्रोश परशुरामाला कळताच परशुराम त्वरीत आश्रमात आले. त्यांनी प्रथम कार्तविर्याजूनाच्या हजारही पुत्रांचा वध केला व आपल्या पित्याचे शीर आणून पित्याला जीवंत केले. पित्याच्या अंगावर २१ घाव झाल्याने परशुरामाने २१ वेळा पृथ्वीवरून केवळ सत्तांध आणि उन्मत झालेल्या क्षत्रियांचाच नाश केला. त्यानंतर परशुरामाने एक यज्ञ करून भगवंतांचे चिंतन केले व जिंकलेली संपूर्ण भूमी यज्ञाचे पौरोहित्य करणाऱ्या कश्यप ऋषींना दान केली. दान केलेल्या जागेवर राहायचे नाही, म्हणून परशुराम दक्षिणेकडे महेंद्र पर्वतावर जाऊन राहू लागले. तेथे त्यांनी आपल्या परशुच्या साह्याने सागराचे पाणी हटवून सागराकडून भूमी मिळविली व आपल्यासोबत आलेल्या ब्राह्मणांना त्या ठिकाणी वसविले. म्हणून कोकणपासून तर केरळपर्यंतच्या भूमीला परशुरामाची भूमी म्हणून ओळखले जाते.

# जिल्हा नियोजन बैठकीत शेतकऱ्यांच्या व्यथा!

## खा. बजरंग सोनवणे | ३ नव्हे ५ लाखाचे पीक कर्ज द्या

पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड:जिल्ह्यातील बहूतेक भागात शेती खरडा-बर्डाची आहे. यात कधी अस्मानी तर कधी सुल्तानी संकट शेतकऱ्यांच्या मागे उभाच असतात. अशावेळी शेतकऱ्यांना पीककर्ज आवश्यक असते. आतापर्यंत शेतकऱ्यांना ३ लाखापर्यंत पीककर्ज दिले जात असून त्याची मर्यादा वाढवून ता ५ लाखापर्यंत करावे, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केली.जिल्हा नियोजन समितीची बैठक दि.१९ मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन विभागाच्या सभागृहात संपन्न झाली. यावेळी पालकमंत्री ना. अजित पवार, मंत्री ना.पंकजा मुंडे, आ.प्रकाश सोळंके, आ.सुरेश धस, आ.धनंजय मुंडे, आ.संदीप क्षीरसागर, आ.विजयसिंह पंडीत, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे यांनी जिल्ह्यातील महत्वाच्या विषयाला हात घालत बीडसाठी रेल्वे हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. अहिल्यानगर ते परळी रेल्वेमार्गाचे काम सुरू आहे. परंतु मध्यल्या काळात रेल्वेचे रूळ अंथरण्याच्या कामासोबत विद्यूत जोडणीचे काम त्याच वेगाने होणे आवश्यक होते. विद्युत जोडणीस होत असलेल्या विलंबामुळे रेल्वेची हायस्पीड चाचणी होऊनही रेल्वे बीडपर्यंत येऊ शकलेली नाही. दरम्यान, रेल्वे विभागातील ओव्हर ब्रिज, अंडर ब्रिज तयार करीत असताना त्यात अडचणी येतात. त्या सोडविण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. पालकमंत्री अजित पवार यांनीही यात लक्ष घातल्यास अनेक अडचणी सुटून रेल्वे कामाला हायस्पीड गती मिळेल, येणाऱ्या काळात बीडला रेल्वे येईल आणि जिल्हयाच्या विकासाला चालना मिळेल, असेही खा.सोनवणे म्हणाले.



### खा.सोनवणेंनी शब्द टाकला अन् दादांकडून होकार

अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वेमार्गाचे रात्रंदिवस काम सुरू आहे परंतु याचसोबत धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वेची मागणी देखील पुढे आलेली आहे. आपण केंद्रात यासाठी आवश्यक पाठपुरावा करत आहोत, असे सांगत खा.सोनवणे यांनी धाराशिव-बीड-संभाजीनगर रेल्वेमार्ग प्रकल्पासाठी राज्यशासनाने अर्धा हिस्सा देण्यात यावा, अशी महत्वपुर्ण मागणीही उपमुख्यमंत्री अजीत पवार यांच्याकडे केली. यावेळी उपमुख्यमंत्री पवार यांनी देखील ही मागणी मान्य केली.

### झेडपीच्या अतिरिक्त कारभार विषयावर चर्चा

जिल्हा परिषद प्रशासनात काही कर्मचारी प्रशासकिय बदल्यानंतरही अतिरिक्त कामकाजाच्या नावाखाली पुन्हा त्याच ठिकाणी पदभार घेतात. मागील दहा वर्षांपासून जिल्हा परिषदेत जवळपास ७७ कर्मचारी असेच काम आहेत. यामुळे अशा कर्मचाऱ्यांकडे असलेला पदभार काढून त्यांना मुळे ठिकाणी पाठवावे, अशी भुमिकाही खा.बजरंग सोनवणे यांनी मांडली. यावेळी या विषयावर अधिकाऱ्यांनी चर्चा करून कार्यवाही करू, असे सांगितले.

### बोगस पिकविम्यावरही उठवला आवाज

बीड जिल्ह्यात मागील काळात बोगस पीक विमा भरून परळी भागातील लोकांनी कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. याप्रकरणी तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणीही खा.सोनवणे यांनी केली.

# पंचायत समितीने लुबाडने थांबवावे

## ॲड.नारायण गोले:प्रशासन दिले निवेदन



पुण्यभूमी प्रतिनिधी

माजलगाव:तालुक्यातील विविध योजना बाबत पंचायत समिती कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी गांभीर्यपूर्वक काम करायला धजत नसून शेतकरी व सर्वसामान्यांची पैशाअभावी अडवणूक केली जात असून घरकुल योजना, रोजगार हमी योजनेतील विहिरीच्या कामासाठी ग्रामसेवक, इंजिनियर व पंचायत समितीतील अधिकारी, कर्मचारी, रोजगार सेवक यांचे दर निश्चित झाले असून छत्रबोरगाव येथील अभियंता जायभाये हे तर घरकुलासाठी सरसकट व सक्तीचे एक हजार रुपये घेत असल्याची तक्रार गट विकास अधिकारी यांना देऊन त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली, माजलगाव शहरातील कृषी सेवा केंद्रांना पंचायत समितीतील कृषी अधिकारी गटपाळे हे पाठीशी घालत असून कृषी सेवा केंद्राच्या संचालकाकडून शेतकऱ्यांना खते नसल्याबाबत सांगून अडवणूक करून त्यांची आर्थिक पिळवणूक केली जात असल्या बाबतची तक्रार केली व पंचायत समिती कार्यालयातील भ्रष्टाचाराच्या दरपत्रकाची यादी गटविकास अधिकारी » पान २ वर

# सीबीएसईकडून समन्वयकपदाची धुरा

## अभिनंदनिय:सिंदफणाचे प्राचार्य अन्वर शेखांची निवड

पुण्यभूमी प्रतिनिधी



माजलगाव:येथील विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूल चे प्राचार्य अन्वर शेख यांची केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) तर्फे जिल्हा प्रशिक्षण समन्वयक (डीटीसी) पदी निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल अन्वर शेख यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

सविस्तर वृत्त असे की या निवडीची माहिती सीबीएसईच्या पुणे विभागीय कार्यालयाकडून दि. १९ मे २०२५ रोजी पत्राद्वारे देण्यात आली. त्याचबरोबर महावीर इंग्लिश स्कूल कडा आष्टी, बीड येथील प्राचार्य श्री. अभिलाष कुडियाथू यांची उप जिल्हा प्रशिक्षण समन्वयक (डीडीटीसी) पदी निवड करण्यात आली आहे. या दोन्ही शिक्षणतज्ञांच्या निवडीमुळे बीड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात नवी चैतन्यता निर्माण होणार आहे. सीबीएसईच्या पुणे केंद्राच्या प्रमुख/उप सचिव डॉ. मृदुला सिंह यांनी पाठवलेल्या नियुक्ती पत्रात म्हटले आहे की, दोन्ही प्राचार्यांची पात्रता, अनुभव आणि कौशल्य या पदांसाठी अतिशय योग्य आहे. त्यांना बीड जिल्ह्यात सीबीएसई पुणे केंद्राच्या सर्व शैक्षणिक आणि प्रशिक्षण कार्यक्रमांना पाठिंबा देण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या पदाच्या अंतर्गत त्यांना जिल्ह्यातील सीबीएसई संलग्न शाळांच्या शैक्षणिक उत्कर्षासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अंमलबजावणीत सहकार्य करणे आणि शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. बीड जिल्ह्यातील शैक्षणिक वर्तुळात या निवडीचे स्वागत करण्यात आले आहे आणि या दोन्ही शिक्षणतज्ञांकडून जिल्ह्यातील सीबीएसई शाळांच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या निवडीबद्दल सिंदफणा » पान २ वर

# कालिका पोद्दार लर्न स्कूलचे यश

## शैक्षणिक:यशाची परंपरा ठेवली कायम



पुण्यभूमी प्रतिनिधी

पाटोदा:जामखेड येथील सीबीएसई बोर्ड मान्यताप्राप्त कालिका पोद्दार लर्न स्कूलच्या विद्यार्थिनी कु. गार्गी अवसरे हिने दहावीच्या परीक्षेत ९५.६०% गुण मिळवून पाटोदा, आष्टी आणि जामखेड या तीन तालुक्यांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे.

शाळेच्या यशाची परंपरा यंदाही कायम ठेवत विद्यार्थ्यांनी उत्तम कामगिरी केली आहे. गार्गीनंतर चि. श्रेयश राख याने ९४.४०% गुणांसह द्वितीय तर चि. लाभेश चोपडा याने ९४.२०% गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला. यंदा एकूण ५८ विद्यार्थ्यांपैकी ३१ विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा अधिक गुण मिळवत शाळेचा यशाचा आलेख उंचावला आहे. या यशामागे शाळेचे व्यवस्थापक, प्रिन्सिपल सर, सर्व शिक्षकवर्ग व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन आणि विद्यार्थ्यांचे सातत्यपूर्ण परिश्रम कारणीभूत ठरले आहेत. पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी शाळेच्या योगदानाचे मनःपूर्वक कौतुक केले असून संपूर्ण परिसरात या यशाचे अभिनंदन होत आहे.

# गुणवंतांच्या पाठीवर कौतूकाची थाप!

## शैक्षणिक:संस्कृत कोचिंग क्लासेसकडून सत्कार



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब:येथे संस्कृत कोचिंग क्लासेस मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.नगरसेवक सतिश टोणगे हे होते . प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार बालाजी(बप्पा) आडसुळ,पंढरीनाथ मगर साह्यक पोलीस निरीक्षक कळंब,आमलदार परमेश्वर कदम, प्रकाश मांडवकर सर,सोमनाथ गंभीरे सर,रवि (बप्पा) उबाळे,लहाने सर हे होते कार्यक्रमाचे आयोजन संस्कृत शिक्षक ह.भ.प.बळीराम कवडे यांनी केले होते कार्यक्रमाची सुरुवात विद्यादेवी सरस्वती पुजनानी झाली

क्लासेसची विद्यार्थीनी कु. सई काळे हीने सुंदर अभंग गायला या वेळी उपस्थित सर्व विद्यार्थ्यांनी संस्कृत श्लोक पठण केले अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांनी आपल्या परिक्षेतिल गुणा बरोबरच आपल्या अंगातील सुप्त कला कुणालाही तितकेच महत्व द्यावे असे प्रतिपादन केले प्रमुख पाहुणे बालाजी(बप्पा) यांनी संस्कृत,संस्कार आणि संस्कृती जतन करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे असे संबोधले. तसेच भविष्यात स्पर्धा परीक्षेची तयारी कशी करावी लागेल या बद्दल पंढरीनाथ मगर सर आणि परमेश्वर कदम सर यांनी मार्गदर्शन केले सिध्दि पवार व अनुष्का कस्पटे या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले या वेळी जास्त मार्क पडले म्हणून हुरळून न जाता,अभ्यासात सातत्य ठेवावे,ज्यांना कमी मार्क पडले त्यांनी नाराज न होता अभ्यास करावा असे प्रतिपादन सतीश टोणगे यांनी केले सर्व मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांचा » पान २ वर

# प्रेम भक्ती साधना केंद्राचा उपक्रम

## धोरण:गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी:यावर्षी इयत्ता दहावी मध्ये भरघोस यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा परळी येथील प्रेमभक्ती साधना केंद्राच्या वतीने आज सत्कार करण्यात आला.

कु. अक्षरा सुनील घुले ९६% श्वेता विजय सावंत ९४% गौरी आदिनाथ मुंडिक ९४% अक्षरा रवींद्र दहिवाळ ८७% मनोज भागवत मुंडिक ९२% यांचा यावेळी सत्कार करण्यात आला यावेळी सचिन शेठ टाक श्री रमेश जी मुंडीक धारासुरकर ड अशोक शहाणे प्राध्यापक डहाळे सर श्री दिलीप बुरांडे युवा नेते विजय दहिवाळ श्री तेजस टाक भागवत मुडीक श्री आदिनाथ मुंडिक श्री रविंद्र दहिवाळ श्री स्वप्निल दहिवाळ श्री सुनील घुले श्री विजय सावंत श्री उमेश देवकर आदी उपस्थित होते. यावेळी श्री रमेश जी मुंडीक यांनी आभार मानले.

# थर्मलच्या जागेत सौर ऊर्जा प्रकल्प

## धोरण:धनंजय मुंडेंच्या मागणीला यश

पुण्यभूमी प्रतिनिधी



परळी:राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या परळी दौऱ्यात धनंजय मुंडे यांच्या एका महत्त्वाच्या मागणीला यश आले आहे. परळी येथील जुन्या औष्णिक विद्युत केंद्राच्या जागेत बंद असलेल्या संच क्रमांक १ ते ५ च्या जागेत नवीन मेगा सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे यासह नवीन थर्मल मध्ये प्रस्तावित संच क्रमांक ९ ची उभारणी करणे, राख प्रदूषण नियंत्रण उपाययोजना जुन्या विश्राम गृहाचे नूतनीकरण, संच क्रमांक ६ ते ८ साठी स्वतंत्र प्रशासकीय इमारत आदी मागण्याना सकारात्मक प्रतिसाद देत अजितदादा पवार यांनी याबाबत चे प्रस्ताव शासनास सादर करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना दिले आहेत.

माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी याबाबत सातत्याने मागणी केली होती, त्यानुसार या प्रस्तावाच्या अनुषंगाने आज संबंधित अधिकारी यांनी अजितदादा पवार यांच्या समक्ष सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी या सर्वच मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली आज औष्णिक विद्युत केंद्रातील विविध मागण्यांसह परळी वैद्यनाथ येथील श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या कामांचाही समग्र आढावा घेण्यात आला. माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या सहमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या प्रयत्नातून वैद्यनाथ ज्योतिर्लिंग » पान २ वर

# अभिनंदनिय:संदीप काकडेंना पीएचडी पदवी



पुण्यभूमी प्रतिनिधी

कळंब: विलासराव देशमुख फाऊंडेशन,ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स लातूर येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले संदीप किशनराव काकडे यांनी निर्वाण विद्यापीठ, जयपूर येथून इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड कम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विषयात पीएच.डी.पदवी प्राप्त केली आहे काकडे यांनी डिझाइन अँड इव्हॅल्युएशन ऑफ अ मल्टी इनपुट मल्टी आऊटपुट मायक्रोस्ट्रिप पॅच अँटेना फॉर यूज ऑफ फिफ्थ जनरेशन अप्लिकेशन या विषयावर सखोल संशोधन केले हे संशोधन डॉ. निर्मल शर्मा व डॉ.नवनाथ नरवडे यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाले.

संशोधनाच्या कालावधीत त्यांनी एकूण ६ शोधनिबंध यूजीसी केअर आणि स्कोपस सूचीबद्ध जर्नल्समध्ये प्रकाशित केले तसेच ७ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये आपले संशोधन सादर केले याशिवाय २ कॉपीराईट भारत सरकारच्या कॉपीराईट कार्यालयात नोंदणीकृत असून १ पेटंट प्रकाशित करण्यात आले आहे या उल्लेखनीय संशोधन कार्याबद्दल संदीप काकडे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे त्यांनी आपल्या मार्गदर्शक प्राध्यापक,कुटुंबीय, सहकारी आणि संस्थेचे मन:पूर्वक आभार मानले. » पान २ वर

## ऋणानुबंध | बनसारोळा येथील महाराष्ट्र विद्यालयाचे विद्यार्थी

# वर्गमित्रांची पून्हा भरली शाळा

पुण्यभूमी प्रतिनिधी



केज:तालुक्यातील बनसारोळा येथील बनेश्वर शिक्षण संस्था बनसारोळा संचलित महाराष्ट्र विद्यालय बनसारोळा येथे १५ मे २०२५ रोजी १९९५ च्या दहावीच्या बॅचचा गुरुजनांचा सन्मान व विद्यार्थी स्नेह मेळावा संपन्न झाला. पहिल्या सत्रात मान्यवरांचे वाजत गाजत मिरवणूक काढून स्टेजकडे आगमन झाले. दिवंगत गुरुजनांच्या बॅनर वरील फोटोस पुष्पमाला अर्पण करून तसेच कै. नारायण दादा यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पमाला अर्पण करून व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. सर्व गुरुजनांचा यथोचित सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात महाराष्ट्र विद्यालयातून दहावी बोर्ड परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला .कार्यक्रमाचे अध्यक्ष बनेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. नरेंद्र काळे तर प्रमुख उपस्थिती म्हणून बनेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष भागवतराव गोरे व युवराज काकडे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्री अरविंद शिंदे सर यांनी केले या कार्यक्रमात श्री अण्णासाहेब शिंदे, ऑड.राजेंद्रप्रसाद धायगुडे., डॉ .सचिन पवार श्रीमती वर्षा जोगदंड यांनी मनोगत व्यक्त केले. गुरुजनापैकी श्री सय्यद सर, श्री काळे सर, श्री धावरे सर यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप बनेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. नरेंद्रजी काळे यांनी केला. श्री सारणीकर सर, श्री काळे सर, श्री तांबारे सर, श्री ढगारे सर, श्री धावरे सर, श्री नाना गुरुजी, श्री गरड सर, श्री चाटे सर, श्री रानमारे सर, हंडिबाग सर,श्री काकडे सर, श्री तांबोळी सर, श्री जाधव सर, श्री पवार सर, ठोंबरे बापू,काकडे मामा, खोडसे मामी,हे गुरुजन वर्ग प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मुख्याध्यापक श्री पालकर , मुख्याध्यापक श्री रंगनाथ काकडे व त्यांचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी दहावीच्या १९९५ व्या बॅचच्या एकूण ८५ मुला-मुलींनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रोफेसर डॉ .मोहन बंडे व आभार प्रा. शंकर पवार यांनी मानले . याप्रसंगी सर्व उपस्थितांना स्नेहभोजनाचे » पान २ वर

# मान्सूनपूर्व विद्युत दुरुस्त्या करा

## प्रश्न:ग्रामस्थांमधून होऊ लागली मागणी



पुण्यभूमी प्रतिनिधी

केज:सध्या केज तालुक्यात विजेचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पडत असलेल्या अवकाळी पावसाने विद्युत पुरवठ्यात अडथळे येऊ लागले असून पावसाच्या सरी पडताच वीज पुरवठा खंडित होत आहे. परिणामी, पावसाळा सुरू होण्यापूर्वी विजेचा प्रश्न ऐरणीवर आला असून पावसाळ्यात विद्युत सुरळीत राहील का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्यामुळे मॉन्सून पुर्व विद्युत दुरुस्त्याची कामे तात्काळ पूर्ण करून घेण्याची मागणी होत आहे. दरवर्षी विद्युत महावितरण कंपनीकडून पावसाळा » पान २ वर